महाराष्ट्र विधानपरिषद

पहिले अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक ०७ मार्च, २०१८ / फाल्गुन १६, १९३९ (शके)

(१)	**मुख्यमंत्री**	**यांचे प्रभारी विभाग**
(२)	**गृहनिर्माण मंत्री**	
(३)	**कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**	

प्रश्नांची एकूण संख्या - ७६

नागपूर एम्प्रेस सिटी व मॉलमधील अनधिकृत बांधकामाबाबत

(१) * ३८०६० प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर एम्प्रेस सिटी व मॉलमधील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याकरिता केएसएल आणि इंडस्ट्रीजची सुधारित ले-आऊट योजना नागपूर महानगरपालिकेने नाकारली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरटीआय अंतर्गत मिळवलेल्या कागदपत्रांनुसार फायर ॲण्ड इमर्जन्सी सर्व्हिसेस डिपार्टमेंटने जारी केलेल्या फिटनेस सर्टिफिकेटची वैधता दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास संपली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एम्प्रेस सिटी व मॉल सुधारित ले-आऊट योजना नाकारण्यात आली असून दिनांक २६ ऑगस्ट, २००५ रोजी केएसएलला पाच भूखंड देण्यात आले आहेत व या पाच भूखंडांच्या एकत्रिकरणाला परवानगी नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केएसएलने ले-आऊटमध्ये अनिवार्य मनोरंजनासाठी जागा सोडली नाही, म.रा. अनिवासी प्रमाणपत्राचे अनिवार्य प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही, चौथ्या मजल्यावर पार्किंगसाठी व्यवस्थाही तयार केली नाही, मालमत्ता कर व पाणी देयकाची रक्कम, बेसमेंट खोदताना लॉयलटी भरलेली नाही व भाग भोगवटा देखील भरण्यात आला नसूनही संपूर्ण मॉल सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मॉलमधील अनधिकृत बांधकामाबाबत नागपूर महानगरपालिकेने नोटीस दिली असून, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) होय. इमारतधारकाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियमाच्या तरतुदीनुसार जानेवारी, २०१८ ते जुलै, २०१८ या कालावधीचे "बी" प्रमाणपत्र महानगरपालिकेकडे सादर केलेले आहे.

(३) नाही.

महानगरपालिकेने सन २००५ मध्ये अभिन्यासात ५ भूखंडांना मंजूरी दिली होती. तद्नंतर भूखंड क्र. १ व २ चे एकत्रिकरण करुन व इतर स्वतंत्र भूखंडावर इमारत बांधकामासाठी सन २००६ मध्ये मंजूरी देण्यात आली होती. तद्नंतर भूखंड क्र. ३ व ४ चे एकत्रिकरण करुन व भूखंड क्र. १ व २ आणि भूखंड क्र. ५ मध्ये इमारत बांधकामासाठी सन २००९ मध्ये सुधारित मंजूरी देण्यात आली होती. तथापि सुधारित बांधकाम परवानगी महानगरपालिकेने दिनांक २०/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये नाकारलेली आहे.

(४) अंशत: खरे,

अभिन्यासात मनोरंजनासाठी जागा सोडण्यात आली होती. या जागेवर विकासकाने ३१४.९६ चौ.मी. मंदिराचे अनधिकृत बांधकाम तसेच चौथ्या माळ्यावर वाहनतळा ऐवजी ११२५७.८८ चौ.मी. अनधिकृत बांधकाम केलेले आहे. महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ अन्वये बांधकाम निर्मुलनाची दिनांक २६/८/२०१५ रोजी अंशत: कार्यवाही केलेली आहे.

महानगरपालिकेने दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत चालू मागणी रुपये १,९५,०८,९७६.०० व बकाया मागणी रुपये १२,२३,९१,४७६.०० व शास्तीचे रुपये ३२,३५,१३५.०० अशी एकूण रुपये १४,५१,३५,५८५.०० ची मागणी विकासकाकडून करण्यात आलेली होती. त्यापैकी मा.न्यायालयाचे आदेशानुसार दिनांक २९/११/२०१७ रोजी रुपये २.०० करोडचा भरणा केलेला आहे. उर्वरीत रक्कम वसुल करण्याबाबत महानगरपालिकेकडून कार्यवाही चालू आहे.

(५) महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ अन्वये बांधकाम दिनांक २६/०८/२०१५ व दिनांक १६/०३/२०१७ रोजी अंशत: निर्मुलनाची कार्यवाही केलेली आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे याचिका क्र. १६५८/२०१६ मध्ये दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकाम निर्मुलनाची कार्यवाहीला Stay दिल्यामुळे कार्यवाही प्रलंबित आहे.

(६) नाही.

राज्यात बालगुन्हेगारीत वाढ झाल्याबाबत

(२) * ३८८३७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.चंद्रकांत रघुवंशी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गुन्हेगारीचा लेखाजोखा मांडणाऱ्या क्राईम इन महाराष्ट्र-२०१६ या अहवालानुसार १६ ते १८ या वयोगटातील बालगुन्हेगारीमध्ये १३.८४ टक्क्यांनी वाढ झाल्याची माहिती माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालगुन्हेगारीचे प्रकार मुंबई, सातारा व पुणे शहरात सर्वाधिक होत असल्याचे माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील वाढती बालगुन्हेगारी रोखण्यासाठी धोरण आखण्याबाबत तसेच बालगुन्हेगारांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून होणारे गुन्हे रोखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना खालील प्रमाणे -

बालगुन्हेगारी रोखण्यासाठी सर्व घटक प्रमुखाना मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहे.

विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठी राज्यात प्रत्येक जिल्ह्यास एक असे एकूण ३५ बाल न्याय मंडळे व सर्व जिल्ह्यामध्ये बाल कल्याण समिती गठीत करण्यात आलेली आहे.

विधीसंघर्षग्रस्त बालके तसेच काळजी व संरक्षण आवश्यक असलेली बालके यांचेसाठी राज्य समन्वय समितीची नियुक्ती करण्यात आली आहे.

नवीन अधिनियमानुसार सर्व पोलीस घटकात विशेष बालपथक स्थापन करणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने दिनांक १४/०२/२०१८ अन्वये सर्व पोलीस घटकांमध्ये विशेष बाल पोलीस पथक स्थापन करणेबाबत सूचना निर्गमित केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात समूह विकास योजना लागू करण्याबाबत

(३) * ३७७६६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे शहरांप्रमाणेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात समूह विकास योजना (cluster Development scheme) लागू करण्याबाबत श्रीनिवास घाणेकर यांनी दिनांक ८ मार्च, २०१६ व तद्नंतर दिनांक २६ जून, २०१७ रोजीच्या निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, संचालक, नगररचना महाराष्ट्र शासन आदींकडे निवेदन सादर करून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात समूह विकास योजना (cluster Development scheme) लागू करण्यासंबंधीचा ठराव कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महासेभेने सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी विषय क्र. १४, ठराव क्र. ८ अन्वये पारित करून शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात समूह विकास योजना (cluster Development scheme) लागू करण्याच्यादृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) होय.

(३) मुंबई महानगर प्रदेशातील बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिकेतील सिडकोचे क्षेत्र वगळून उर्वरीत सर्व महानगरपालिकांना एकात्मिक विकास नियंत्रण नियमावली लागू करण्याचा तत्वता निर्णय शासनाने घेऊन सदरची नियमावली आम जनतेकडून हरकती/सूचना मागविण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१अेअे)(अे) मधील तरतुदीनुसार दिनांक २८/०२/२०१७ रोजी प्रसिध्द केली आहे. सदर नियमावलीमध्ये नागरी पुनर्निर्माण समूह विकास योजनेची नियमावली प्रस्तावित आहे. तसेच प्राप्त हरकती/ सूचनांवर संबंधितांना सुनावणी देवून अहवाल शासनास सादर करणेकरीता शासनाने सहसंचालक नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांना अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे. अर्जदार यांचा अर्ज सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. सदरची नियमावली मंजूर झाल्यानंतर ती कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राकरीता सुध्दा लागू होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील एन.डी.डेव्हकॉन प्रा.लि. या बांधकाम व्यावसायिक कंपनीच्या संचालकाने ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत

(४) * ३८३१५ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांजूरमार्ग नेहरुनगर परिसरात एन.डी. डेव्हकॉन प्रा.लि. या बांधकाम व्यावसायिक कंपनीच्या संचालकाने गृह प्रकल्पांमध्ये घरे देण्याच्या नावाखाली ग्राहकांकडून आगाऊ रक्कम घेऊन सुमारे ७ कोटी रुपयांची फसवणूक केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासक संचालकांवर मोफा कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार फसवणूक झालेल्या ग्राहकांच्या रक्कम वसुलीबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) सदरहू प्रकरणी कांजूरमार्ग पो.ठाणे गु.र.क्र. १५४/१७ कलम ४२०, १२०(ब) भा.दं.वि. सह कलम ३, ४, ५, ८, १३ मोफा अधिनियम अन्वये तीन विकासक संचालक व कंपनी विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्हयातील विकासक यांचेविरुध्द दाखल गुन्हयांची व्याप्ती पाहता, गुन्हयांचा तपास जलदगतीने होण्याकरीता विशेष तपास पथक स्थापन करण्यात आलेले आहे.

सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेमार्फत सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील स्मार्टसिटी योजनेतील प्रकल्प सुरु करण्याबाबत

(५) * ३९०२६ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात दोन वर्षापुर्वी सुरु करण्यात आलेल्या स्मार्टसिटी योजनेंतर्गत ५३ प्रकल्पांपैकी अवघे २ प्रकल्प सुरु करण्यात आले असल्याचे दिनांक ४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत केवळ उद्याने विकसित करण्यात आली असून वायफाय व फायबर ऑप्टीकल केबल टाकण्यासाठी चर खोदण्याच्या कामावर निधी खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश झाल्यानंतर या अंतर्गत करण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांपैकी किती प्रकल्प निविदा प्रक्रिया व अनियमितता यामुळे प्रलंबित राहिले आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उर्वरित प्रकल्प सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) स्मार्ट सिटी योजनेंतर्गत पुणे शहरामध्ये माहे नोव्हेंबर, २०१७ अखेर एकूण ४ प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली होती तर ५ प्रकल्पांच्या कामाचे कार्यादेश देण्यात आलेले होते, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक स्मार्ट सिटीसाठी विशेष उद्देश वहनाचे (एस.पी.व्ही.) गठण करण्यात आले आहे.

विशेष उद्देश वहनास सर्व प्रशासकीय तसेच वित्तिय अधिकार देण्यात आले असून प्रकल्प कालमर्यादेत राबविण्याची पूर्ण जबाबदारी विशेष उद्देश वहनांची आहे.

(२) हे खरे नाही.

स्मार्ट सिटी योजनेंतर्गत केवळ उद्याने विकसित करण्यात येत नसून क्षेत्रविकास, नागरी वाहतूक, पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान इत्यादी विविध क्षेत्रांशी संबंधित प्रकल्प राबविले जाणार आहेत.

वायफाय व फायबर ऑप्टीकल केबल करीता चर खोदण्याच्या कामासाठी स्वतंत्रपणे कोणताही निधी खर्च करण्यात आलेला नसून स्मार्ट घटकांच्या (इलिमेन्टच्या) कामामध्येच चर खोदण्याचे काम समाविष्ट आहे.

(३) या योजनेतील सर्व प्रकल्प प्रगतीच्या विविध टप्प्यांवर असून कोणताही प्रकल्प निविदा प्रक्रिया व अनियमितता यामुळे प्रलंबित नाही.

(४) लागू नाही.

(५) लागू नाही.

राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत

(६) * ३७८२७ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबतचा अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पदवीधर अंशकालीन कर्मचारी संघटनेने लोकप्रतिनिधीमार्फत मा.मुख्यमंत्री यांना अनेक वर्षापासून तसेच दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) होय.

(२) होय.

(३) राज्यातील पदवीधर अंशकालीन उमेदवारांचा मागील १५ वर्षापासून प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याकरिता तसेच अंशकालीन उमेदवारांना विशेष बाब म्हणून कंत्राटी तत्वावर नोकरीची संधी उपलब्ध करुन देण्याचे धोरण ठरविण्याकरिता शासन निर्णय दिनांक १६/२/२०१८ अन्वये एक समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

साक्री (जि.धुळे) नगरपंचायतीमधील मंजूर आकृतीबंधानुसार कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(७) * ३८५०५ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) नगरपंचायत निर्माण होऊन ३ वर्षे झाली असली तरी नगरपंचायतीसाठी पुरेसा कर्मचारी वर्ग दिला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतीमध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे साक्री भागातील नागरिकांना त्रास होत असून सोयी-सुविधांचा अभाव असल्याने हा भाग विकासापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नगरपंचायतीमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) अशा आशयाचे निवेदन पालकमंत्री, धुळे यांचेकडून शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(३) साक्री नगरपंचायतीकरीता शासन निर्णय, नगर विकास विभाग दिनांक ०५/०७/२०१६ व १२/०२/२०१८ अन्वये २८ पदांच्या आकृतिबंधास मंजूरी देण्यात आली आहे.

राज्यस्तरीय संवर्गातील १ पद कार्यरत असून, विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या आदेशान्वये पात्र ८ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यात आले आहे.

नगरपंचायतीच्या मंजूर आकृतिबंधानुसार उर्वरीत कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथे हॉकर्स झोन तयार करण्याबाबत

(८) * ३८९८९ श्री.प्रकाश गजभिये : दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक २६८६६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे हॉकर्स झोन तयार करुन रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्यांना जागा उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने नागपूर महापालिकेला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत नागपूर येथे किती हॉकर्स झोन तयार करण्यात आले आहेत व किती हॉकर्स झोनला जागा उपलब्ध करुन दिली आहे काय,

(३) असल्यास, आणखी किती हॉकर्स झोन तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे व ते हॉकर्स झोन केंव्हा तयार करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) नागपूर शहरात ९२ ठिकाणी फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यात आलेली आहेत.

राष्ट्रीय फेरीवाला धोरणांतर्गत नागपूर महानगरपालिका हद्दीतील नोंदणीकृत २८८१ हॉकर्सना जागांचे आवंटन केलेले आहे.

तथापि, आवंटनाची प्रक्रिया सुरु असताना मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र. ६२१५/२०१५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३०/०१/२०१७ रोजी “जैसे-थे” चे आदेश दिलेले आहेत.

(३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे, याबाबतची सर्व प्रक्रिया सद्य:स्थितीत स्थगित ठेवण्यात आलेली आहे.

औरंगाबाद क्षेत्रातील मराठी व उर्दू माध्यमाच्या अनुदानित शाळांना महानगरपालिकेच्या करातून सवलत मिळणेबाबत

(९) * ३८१४३ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०४७ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील मराठी व उर्दू माध्यमाच्या अनुदानित शाळांना महापालिकेच्या करातून सवलत द्यावी या मागणीसाठी मा.अध्यक्ष, विधानसभा यांच्यासह महानगरपालिकेचे महापौर, उपमहापौर व आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका आणि शाळांच्या संस्थाचालकांची एक बैठक सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान संपन्न झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत संस्थाचालकांनी केलेल्या मागणीचे स्वरुप काय आहे व यासंदर्भात महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

(२) सदर बैठकीत शैक्षणिक संस्थाचालकांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३२(१) ब अन्वये सामान्य कर माफ करावे अशी मागणी केली आहे.

सदर मागणीच्या अनुषंगाने, औरंगाबाद महानगरपालिकेचे दिनांक ३०/१२/२०१६ च्या कार्यालयीन आदेशान्वये शैक्षणिक संस्थेच्या मालमत्ता कराचा अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी मुख्य लेखापरिक्षक औरंगाबाद महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती घटीत करण्यात आली.

समितीची बैठक दिनांक ०८/१२/२०१७ मध्ये घेण्यात आलेली असून, औरंगाबाद महानगरपालिकेच्या ठराव क्र.५१०/ई दिनांक ०७/०२/२०१४ अन्वये संमत केलेल्या ठरावानुसार शैक्षणिक संस्थांना करण्यात आलेली कर आकारणी योग्य असून त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही, असा समितीने निर्णय घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांना आळा घालणेबाबत

(१०) * ३७७६९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिलांच्या बाबतीत घडणाऱ्या गुन्हयांची चिंताजनक परिस्थिती असून क्राईम इन महाराष्ट्र या सन २०१६ च्या अहवालानुसार गेल्या वर्षात महिलांशी संबधित कायदयान्वये ३१,२७५ गुन्हयांची नोंद झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पोलीस तपास अधिकाऱ्यांनी तपास पूर्ण केलेल्या आणि त्यापैकी शिक्षा झालेल्या गुन्हयांच्या खटल्यांच्या संख्येची माहिती देणारे संकेतस्थळ नसल्यामुळे सन २०१६ मध्ये महिला अत्याचाराच्या गुन्हयांच्या खटल्यांमध्ये फक्त ११ टक्के खटल्यांमध्ये शिक्षा झाल्या असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिला अत्याचाराचे गुन्हे वाढत असताना राज्यातील पोलीस दलात फक्त १२.८४ टक्के महिला पोलीस कर्मचारी असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पोलीस दलात महिला पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणेबाबत व राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांना आळा घालणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.
(२) क्राईम इन महाराष्ट्र २०१६ च्या प्रसिध्द अहवालानुसार विविध शिर्षकाखाली निकाली निघालेल्या न्यायालयीन खटल्यातील दोषसिध्दीची वर्गवारी एकूण ११.१७ इतकी आहे.
(३) होय.

राज्य पोलीस विभागात एकूण २०६०८० पोलीस अधिकारी कर्मचारी कार्यरत असून पैकी १६३२ महिला पोलीस अधिकारी व २४४६४ महिला पोलीस कर्मचारी अशी एकूण २६३९६ इतके महिला पोलीस अधिकारी कार्यरत आहेत.
(४) सर्व पोलीस घटक कार्यालयांमध्ये पोलीस भरतीमध्ये आरक्षणानुसार महिलांना प्राधान्य देवून महिला पोलिसांची भरती करण्यात येते.

महिला अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी राज्य पोलीस मुख्यालय व सर्व पोलीस ठाण्यांमध्ये स्वतंत्र महिला पोलीस कक्षाची स्थापना करण्यात आली असून तेथे पो.नि./स.पो.नि./पो.उ.नि. दर्जाचे अधिकारी, ५ महिला पोलीस अधिकारी व २ पुरूष कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच महिला अत्याचार गुन्ह्यांसदर्भातील घटनांना आळा घालण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात तपास पथके गठीत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नेहरुनगर, कुर्ला (पुर्व), मुंबई येथील पोलीस वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत

(११) * ३७८७३ ॲड.अनिल परब : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेहरुनगर, कुर्ला (पुर्व), मुंबई येथील पोलीस वसाहतीमधील १९ इमारतींचा पुनर्विकास पोलिसांच्याच सप्ततारा सहकारी गृहनिर्माण संस्थेतर्फे करण्याबाबतचा प्रस्ताव तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.गृहनिर्माण मंत्री तसेच म्हाडा यांच्याकडे गेल्या २ वर्षात वारंवार सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्था म्हाडाला विविध देयकापोटी रुपये ५ कोटी २२ लाखाची रक्कम भरण्यास तयार असून पोलीस स्टेशन व आरोग्य केंद्र बांधून देण्याबाबत तयार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) मा.आमदार श्री.मंगेश कुडाळकर यांनी दिनांक २३/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये पोलिसांच्या सप्ततारा सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित), नेहरु नगर, कुर्ला (पुर्व), मुंबई - ४०००२४ येथील १९ इमारतींच्या पुनर्विकास करुन पोलिसांना मालकी हक्काने घर मिळणेबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर केले आहे.

(२) व (३) पोलीस विभागाने नेहरु नगर, कुर्ला (पुर्व), मुंबई - ४०००२४ येथील १९ इमारतींचे वितरण पोलीस कर्मचाऱ्यांना सेवानिवास स्थानाकरीता केले असल्याने सदर संस्थेस पुनर्विकासाकरीता परवानगी देणे म्हाडास शक्य नाही, असे म्हाडाने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिकसह राज्यामध्ये होमगार्डच्या धर्तीवर ट्रॅफिक वार्डन योजना सुरु करण्याबाबत

(१२) * ३७९०६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकसह राज्यामध्ये होमगार्डच्या धर्तीवर ट्रॅफिक वार्डन योजना सुरु करण्यासाठी स्मार्ट सिटी मधून किंवा ट्रॅफिकच्या दंडातून ट्रॅफिक वार्डनला मानधन अदा करण्याबाबत दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) व नगरविकास यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रॅफिक वार्डन योजना सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) व नगरविकास यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले.

ट्रॅफिक वार्डनची आवश्यक संख्या, ट्रॅफिक वार्डन कामासाठी होमगार्ड उपलब्ध होऊ शकतील का, ट्रॅफिक वार्डन यांना देय असलेले मानधन व त्यासाठी निधीची तरतूद इ. विषयावर अधिक माहितीसह निवडक शहरासाठी प्रस्ताव सादर करण्याबददल निर्देश देण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ नुसार बांधकाम परवानगीसाठी मोजणी नकाशा आवश्यक केल्याबाबत

(१३) * ३८८५० डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ नुसार बांधकाम परवानगीसाठी मोजणी नकाशा आवश्यक केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ लागू झाल्यापासून मोजणी नकाशा नसल्यामुळे किती प्रकरणे नाकारली आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मोजणी नकाशा अभावी नाकारलेल्या प्रकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ नुसार नगर विकास विभागाने दिनांक २३/०६/२०१५ रोजीचा शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१५/प्र.क्र.८९/नवि-१४ अन्वये लोकसेवांची यादी, आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलिय अधिकारी निश्चित केलेले आहेत. यापैकी बांधकाम परवानगी देणे या सदरात नमूद करण्यात आलेली आवश्यक कागदपत्रे संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमावलीत नमूद असल्यानुसार आहे. राज्यातील नियोजन प्राधिकरणांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बांधकाम परवानगीसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये मोजणी नकाशाचा समावेश आहे. सदरची बाब या अध्यादेशानुसार त्याअंतर्गतच्या सेवा निश्चित करतेवेळी शासन निर्णयात नमूद करण्यात आलेली आहे.
(२) राज्यातील नियोजन प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमावलीत बांधकाम परवानगी प्रकरणासाठी आवश्यक कागदपत्रांच्या यादीत मोजणी नकाशाचा समावेश असल्याने केवळ महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ लागू झाल्यापासून मोजणी नकाशा नसल्यामुळे प्रकरणे नाकारल्यात आल्याची बाब नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पाथरी (जि.परभणी) येथील श्री साईबाबा यांच्या जन्मभूमी विकास आराखडयाबाबत

(१४) * ३८४६७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४५४ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील श्री साईबाबा यांच्या जन्मभूमी विकास आराखडयास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी परभणी यांनी सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी व इतर यंत्रणांनी त्रुटींची पुर्तता करून सदरील आराखडा प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून नियोजन विभागाच्या दिनांक ०४/०६/२०१५ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने अतिरिक्त नियत व्यय उपलब्ध होण्याच्या अधिनतेने तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी प्रशासकीय कामकाजाकरिता मुंबई शहरात स्वतंत्र इमारत बांधण्याबाबत

(१५) * ३८६५९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सतिश चव्हाण : दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक २७३८८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रशासकीय कामकाजाकरिता अनेक वर्षांपासून मुंबई शहरात स्वतंत्र इमारत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयासाठी सद्य:स्थितीत मुंबई येथे स्वतंत्र इमारत किंवा शासकीय जागा उपलब्ध करण्यात येईल असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासित केल्यानुसार जागा उपलब्ध करण्यात आली आहे काय, असल्यास, केव्हा व कोठे,

(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी मुंबई विद्यापीठ कलिना-सांताक्रुझ परिसर येथे अथवा वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स परिसर तसेच शासकीय जागेवर इमारत बांधणे हे पर्याय असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयासाठी मुंबई येथे तयार इमारत किंवा जागा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. मलोआ १११६/प्र.क्र.८७/आठ, दिनांक ७ जुलै, २०१६ अन्वये प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. समितीने दिनांक ३ मार्च, २०१७ अन्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात समितीने शिफारस केलेल्या अ) माझगाव येथील विक्रीकर भवन व ब) चेंबूर येथील प्रस्तावित प्रशासकीय इमारतीतील १ लाख चौ. फुट बांधीव क्षेत्रफळाची जागा अथवा

क) सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथील १०,००० चौ. फूट जागेचा भूखंड उपलब्ध करुन देण्याच्या पर्यायांची पडताळणी करण्यात येत आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाबाबत

(१६) * ३८६७० श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नागोराव गाणार, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प हा सिडकोचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून त्याकरीता मौजे.पारगाव, पारगाव-डुंगी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील जमीन शासन संपादित करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई विमानतळ प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाकरीता अतिरिक्त जागेसाठी पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील ओवळे आणि उलवा या गावांच्या पाठीमागील मोठमोठया डोंगरांचे उत्खनन व सपाटीकरण करण्यासाठी जी.व्ही.के व आरबीआर कंपन्यांनी दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मोठया तिव्रतेचे स्फोट करतेवेळी खबरदारी न घेतल्याने सिडकोचे अभियंते व जी.व्ही.के कंपनीचे ७ कर्मचारी जखमी झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त स्फोटामुळे ओवळे गावातील शाळा व काही घरांना मोठया प्रमाणात तडे गेले आहेत तसेच विमानतळ भराव, प्रस्तावित रस्त्यांची कामे, उलवे खाडीचे मार्ग वळविणे, टेकडीचे सपाटीकरण इत्यादी कामांचे गावावर गंभीर परिणाम होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ओवळे उलवा टेकडीवर माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्रकल्पग्रस्तांनी स्फोटाच्या ठिकाणी मोर्चा काढून स्फोटाचे काम बंद करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या सोडवून प्रथम त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय,

नवी मुंबई विमानतळ गाभा क्षेत्रातील विकास पुर्व कामे सिडको महामंडळामार्फत करण्यात येत असून गाभा क्षेत्रातील जमीन विकासांतर्गत टेकडी सपाटीकरणाचे काम कट्रोल ब्लास्टींगच्या माध्यमातून करण्यात येत आहे. दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी कंट्रोल ब्लास्टींगव्दारे सिध्दार्थ नगर जवळ सपाटीकरणाचे काम सुरु असताना उलवे टेकडीवरुन दगड घसरुन झालेल्या अपघातात सिडकोचे अभियंता, कंत्राटदाराचे कर्मचारी व सुरक्षारक्षक जखमी झाले ही बाब खरी आहे.

(३), (४) व (५) विमानतळ गाभा क्षेत्रातील उलवे टेकडीच्या सपाटीकरण कामावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी केंद्र शासनाच्या अखत्यारीतील केंद्रीय खणन आणि अनुसंधान संस्था, धनबाद, या संस्थेची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती केली असून त्यांच्या सल्ल्यानुसार आवश्यक त्या सुरक्षा बाबींची खातरजमा तसेच जमिनीचे कंपन आणि ध्वनी यांचे मोजमाप करुनच कंट्रोल ब्लास्टींग करण्यात येते.

तसेच दिनांक ६/१/२०१८ रोजी झालेल्या घटनेचा अहवाल सादर करणेबाबत तांत्रिक सल्लागार संस्थेला कळविण्यात आले आहे. दरम्यान ब्लास्टींगचा परिसरातील गावांना व नागरीकांना कोणताही धोका होवू नये, यासाठी सर्वतोपरी खबरदारी घेण्यात येत आहे.

सदर घटनेनंतर प्रकल्पग्रस्तांनी मोर्चा काढून काम बंद करण्याची मागणी केली होती ही बाब खरी आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी वाटप करावयाच्या एकूण भूखंडापैकी ९०% भूखंड ताबा देण्यासाठी तयार आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक स्मार्ट सिटी योजनेंतर्गत विकास कामांच्या अंमलबजावणीबाबत

(१७) * ३७९६९ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगराचा केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेत समावेश करण्यात येवून स्मार्ट सिटी योजना प्रयोजनास्तव केंद्र व राज्य शासनाने २८३ कोटी रूपयांचा अनुदान निधी नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनकडे विकास कामांसाठी वर्ग केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनकडून स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत कोणकोणती विकास कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत, या विकास कामांचे सर्वसाधारण स्वरुप व सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत विकास कामे केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानांतर्गत नाशिक शहराची निवड झाली असून सदर योजनेसाठी प्रथम हप्त्याचा निधी म्हणून रुपये २८५ कोटी इतका निधी नाशिक महानगरपालिका स्तरावर नेमलेल्या नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. या विशेष उद्देश वहनाकडे वर्ग करण्यात आला आहे.

विशेष उद्देश वहनास सर्व प्रशासकीय तसेच वित्तिय अधिकार देण्यात आले असून प्रकल्प कालमर्यादेत राबविण्याची पूर्ण जबाबदारी विशेष उद्देश वहनांची आहे.

(२) व (३) स्मार्ट सिटी योजनेंतर्गतच्या क्षेत्र आधारित विकास व पूर्ण शहरासाठीचे प्रकल्प (पॅन सिटी) मिळून पायाभूत विकास, पर्यावरण, ऊर्जाबचत, पाणीपुरवठा, सुरक्षा, वाहतुक ई. क्षेत्राशी संबंधित ५१ प्रकल्प राबविण्यात येणार आहेत.

सदर ५१ प्रकल्पांपैकी ६ प्रकल्पांची कामे पूर्ण झाली आहेत. ५ प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. ७ प्रकल्पांची कामे निविदाधीन आहेत. उर्वरीत प्रकल्पांचे डीपीआर प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील खासगी विनाअनुदानित शाळांना अनुदान देणेबाबत

(१८) * ३९१३९ श्री.बाळाराम पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.अनिल परब, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुनिल तटकरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक शिक्षण ही महापालिकेची जबाबदारी असतानाही मुंबईतील सुमारे ५० मराठी शाळांसह एकूण ६३ खाजगी विनाअनुदानित शाळांना मुंबई महापालिकेने अनुदान नाकारले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार मुंबईतील गरीब व गरजू विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान थांबविण्यासाठी या शाळांना अनुदान देण्यासंबंधी शासनाने महापालिकेला निर्देश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासनाकडे महापालिकेच्या शिक्षण विभागाची सुमारे २१८८ कोटी रुपयांची थकबाकी थकित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर थकित रक्कम महापालिकेला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राथमिक शिक्षणासाठी शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ०३/०३/१९७६ व दिनांक १७/१२/१९९४ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% इतकी रक्कम अनुज्ञेय आहे.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस शालेय शिक्षण विभागाकडून सन २०१६-१७ पर्यंत चौथ्या वेतन आयोगानुसार वेतन अनुदान प्राप्त होत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने शालेय शिक्षण विभागाकडे प्राथमिक शिक्षणासाठी सन २००५ पर्यंत पाचव्या व सन २००६ नंतर सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन अनुदानाची मागणी सादर केली आहे.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचव्या व सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करण्याबाबत निर्णय झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे शालेय शिक्षण विभागाकडून कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावरील मेट्रो रेल्वे प्रकल्पाबाबत

(१९) * ३७८०८ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मोहनराव कदम : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो रेल्वे प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (पीएमआरडीए) राबविण्याचा निर्णय दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला असून या मेट्रो रेल्वे प्रकल्पाची लांबी २३.३ किलोमीटर असून त्यासाठी रुपये ८३१३ कोटी खर्च येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी लागणारा निधी कशाप्रकारे उभारण्यात येणार आहे व प्रकल्पाच्या कामास केंव्हा सुरुवात करण्यात येणार आहे व प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पामुळे किती व्यक्ती बाधित होणार आहेत व त्यांचे पुनर्वसन कशाप्रकारे करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) सदर प्रकल्प सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्वावर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पाच्या कामास माहे मे, २०१८ मध्ये सुरुवात होऊन माहे एप्रिल, २०२१ अखेर पूर्ण करण्याचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.

(३) सदर प्रकल्पामुळे १ रहिवासी घर, ९ दुकाने व १०० झोपड्या असे एकूण ११० घरे बाधित होत असून सदर मेट्रो प्रकल्पामुळे बाधितांचे पुनर्वसन मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरणानुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

परळी वैजनाथ (जि.बीड) येथील वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यात टाकीचा स्फोट होऊन कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

(२०) * ३८०५७ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी वैजनाथ (जि.बीड) येथील वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यात ऊसाच्या रसाच्या टाकीचा स्फोट होऊन सात कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टाकीची देखभाल व्यवस्थापनाने केली नसल्याने व सदर टाकीची तपासणी प्राधिकृत सक्षम व्यक्तींकडून करण्यात न आल्याने ही घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखान्याचे सन २०१६ पासून निरीक्षणही झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत दोषी व्यवस्थापन व संचालक मंडळावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना लि., पांगरी, ता.परळी वैजनाथ, जि.बीड या कारखान्यात दिनांक ०८/१२/२०१७ रोजी अंदाजे दुपारी ३.०० वा. इव्हॅपोरेटर बॉडी क्र. १ चे वाफ गळती दुरूस्तीचे काम झाल्यानंतर सदरील बॉडीचे बॉटम प्लेटचे वेल्डींग अचानक निघून बॉटम प्लेट जमिनीवर पडल्यामुळे व यातील गरम ऊसाच्या रसामुळे सात कामगारांचा मृत्यू झाला हे खरे आहे.
(२) सदर इव्हॅपोरेटर बॉडी क्र. १ ही प्रेशर व्हेसल नसल्याने प्राधिकृत सक्षम व्यक्तीकडून तपासणी करून घेण्याची तरतूद नियमामध्ये नाही. तरी सुद्धा कारखाना व्यवस्थापनाकडून इव्हॅपोरेटर बॉडी क्र. १ ची Ultrasonic testing ही प्राधिकृत सक्षम व्यक्तीकडून दिनांक ०३/१२/२०१७ रोजी करण्यात आली होती. तसेच व्यवस्थापनाने दिनांक ०७/११/२०१७ रोजी सदर इव्हॅपोरेटर बॉडीच्या कॅलेंड्रियाचे हायड्रॉलिक टेस्टींग ४५ Lbs प्रेशरवर केलेली होती व ०८/११/२०१७ रोजी सदर इव्हॅपोरेटर बॉडीच्या वरील मॅनहोलपर्यंत बॉडी पाण्याने भरून Leak टेस्ट घेतली होती. सदर टाकीचे बॉटम प्लेटचे वेल्डींग हे Corrosion, erosion मुळे तसेच २००७ पासून ही बॉडी वापरात असल्याने कमकुवत झाल्याने तुटले व त्यामुळे ही घटना घडली.
(३) संचालनालयामध्ये कारखाने निरीक्षणासाठी CIA (Centralized Inspection Agency) पध्दत चालु असल्याने, त्याअंतर्गत कारखान्याचे नाव वाटप झाल्यासच अधिकाऱ्यास निरीक्षण करता येते. दिनांक २५/०७/२०१६ रोजी CIA अंतर्गत या कारखान्याचे नाव निरीक्षणासाठी आले होते. परंतु त्यावेळी गळीताचा हंगाम नसल्याने कारखाना बंद होता व त्यामुळे निरीक्षण करता आले नाही.
(४) व (५) हे खरे नाही.

सदर प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, औरंगाबाद मार्फत चौकशी करण्यात आली. चौकशीत असे आढळून आले की, सदर इव्हॅपोरेटर बॉडीचे बॉटम प्लेटचे वेल्डींग हे Corrosion, erosion मुळे तसेच २००७ पासून बॉडी वापरात असल्याने कमकुवत झाल्याने तुटले.

याबाबत कारखान्याचे भोगवटादार श्री.नामदेवराव आघाव यांचेवर कारखाने अधिनियम १९४८ चे कलम ७-अ(२)(अ) च्या भंगाबाबत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, बीड यांचे न्यायालयात (खटला क्र. २५६४/२०१७) दाखल करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या कर सहायकाच्या परिक्षेसाठी बसलेले बोगस उमेदवारांना अटक केल्याबाबत

(२१) * ३८५१५ प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रामनिवास सिंह, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा येथे महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या कर सहायकाच्या परिक्षेसाठी बसलेले संदीप भुसारी व सचिन नराळे या कोल्हापूरमधील विक्रीकर अधिकाऱ्यांना दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत उमेदवाराऐवजी पोलीस सेवेतील अधिकारी परिक्षा देत असल्याचा प्रकार काही महिन्यापूर्वी यवतमाळ, लातूरमध्ये निदर्शनास आला असून शासकीय सेवेत सध्या कार्यरत असलेल्या ४९ अधिकाऱ्यांनी शासकीय सेवेतील पदे मिळविण्यासाठी स्वतः परीक्षा देण्याऐवजी बोगस उमेदवारांना परिक्षेस बसविल्याचेही पोलीस तपासता उघड झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

दिनांक ३१/१२/२०१७ रोजी कर सहायक या परिक्षेस नकली (बनावट) उमेदवार बसविल्याचे फिर्यादीवरुन भायखळा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ३३९/१७ कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, ४२०, १२०(ब) ७ व ८ महाराष्ट्र महाविद्यापीठ गैरव्यवहार अधिनियम १९८२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरचा गुन्हा तपासाधिन आहे.

(२) सदर प्रकरणी यवतमाळ व लातूरमध्ये असला प्रकार घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, पोलीस स्टेशन मांडवी, जि.नांदेड येथे गु.र.क्र. २७/२०१६ कलम ४१९, ४२०, ४६८, ४७१, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. या गुन्हयातील तपासाच्या निष्पन्न बाबीवरुन भा.दं.वि. १२० (ब) १९३, १९७, १९८, २०१, २०३, २१३, २१४, २१८, ४६७ ही कलमे वाढविण्यात आली आहेत. सदरहू गुन्हयात आतापर्यंतच्या तपासात १० आरोपी निष्पन्न असून ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आतापर्यंत एकूण ६ आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३(८) अन्वये तपास सुरु आहे.

सदर गुन्हयाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फतीने सुरु आहे.

(३) वरीलप्रमाणे गुन्हे दाखल केले असून अधिक तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पोलीस दलातील कर्मचाऱ्यांचे कर्तव्य आठ तास करण्याबाबत

(२२) * ३८१३७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३५२१६ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस दलातील कर्मचारी पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तसेच पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस निरीक्षक अशा वरिष्ठ पदांवरील अधिकाऱ्यांसाठी आठ तासांचे कर्तव्य करण्याबाबतचा विचार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निम्म्याहून अधिक पोलीस ठाण्यांमधील तीन पाळ्यांमध्ये काम करणे सहज शक्य असल्याचे पाहणीअंती स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पोलिसांना आठ तास कर्तव्याचे वेळापत्रक लागु करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्त, गृह विभागामार्फत शासनाकडे देणार असल्याने पोलिसांचे कर्तव्य आठ तास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातील ९३ पोलीस ठाण्यात टप्प्या-टप्प्याने पोलीस अंमलदारांसाठी (पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक) आठ तास कर्तव्य प्रायोगिक तत्त्वावर सुरु करण्यात आले आहे.

अंमलदारांप्रमाणेच अधिकाऱ्यांसाठी आठ तास कर्तव्य पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यंतच्या अधिकाऱ्यांना लागू करता येईल काय ही बाब तपासण्यात येत आहे.

(२), (३), (४) व (५) सद्यःस्थितीत आठ तास कर्तव्य बृहन्मुंबई आयुक्तालयांतर्गत प्रायोगिक तत्वावर सुरु असून काही कालावधीनंतर याचा आढावा घेऊन त्याप्रमाणे आठ तास कर्तव्य राज्यात लागू करण्याबाबतचा यथोचित निर्णय घेता येईल.

पंढरपूर शहरातील उद्यानात अवैध प्रकार सुरु असल्याबाबत

(२३) * ३८२९३ श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मोहनराव कदम, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर शहरातील मुलांना खेळण्यासाठी असलेले दोन्ही उद्याने दारुचा पिणाऱ्यांचा अड्डा बनले असून या उद्यानात जुगार खेळणे, मांस खाणे इत्यादी अवैध प्रकार सुरु असल्याने या उद्यानात येणाऱ्या पालकवर्गामध्ये मुलांच्या सुरक्षेप्रती भिती निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे नाही.

सदर दोन्ही उद्यानात नगरपरिषदेच्या शिपायांमार्फत तिकीट विक्री करुन नागरिकांना उद्यानात प्रवेश दिला जातो. तसेच, त्या वेळेत अनुचित प्रकार घडणार नाही, याची खबरदारी नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांमार्फत घेतली जाते व त्यावर नियंत्रणही नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांचे असते. तथापि, पंढरपूर शहर पोलीस स्टेशन मधील डी.बी. पथक व निर्भया पथक तसेच, शहरात पेट्रोलिंगसाठी नेमलेले पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी उद्यानाच्या ठिकाणी हुल्लडबाजी करणाऱ्या व्यक्तींवर माहे जानेवारी, २०१८ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११०/११७ प्रमाणे ०२ प्रकरणात कारवाई केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अंमली पदार्थांच्या तस्करीस प्रतिबंध घालण्याबाबत

(२४) * ३८६३४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अंमली पदार्थ तस्करीचे १४ हजार ५९० गुन्हे दाखल असून त्यापैकी १४ हजार १०७ गुन्ह्यांची नोंद मुंबईत करण्यात आल्याचे गुन्हे अन्वेषण विभागाच्या अहवालातून माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंमली पदार्थ तस्करी प्रकरणी राज्यात ६६२ जणांना अटक करण्यात आली असून यामध्ये ३३ परदेशी नागरिकांचा समावेश असल्याचे अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात गांजा तस्करीचे प्रकार वाढले असून तस्करीसाठी महिला व लहान मुलांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करून अंमलीपदार्थांची तस्करीस प्रतिबंध घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) राज्यात १ जानेवारी, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ दरम्यान अंमली पदार्थांचे एकूण १४६३१ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी मुंबई पोलिसांनी अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ अन्वये २१७ गुन्हे अंमली पदार्थ जवळ बाळगलेबाबत व सेवनाची १२६८७ असे एकूण १२९०४ गुन्हे दाखल केलेले आहेत.

(२) राज्यात अंमली पदार्थ जवळ बाळगणे, विक्री करणे, सेवन करणे, अशा गुन्ह्यामध्ये एकूण १५१७५ आरोपीला अटक करण्यात आले असून यामध्ये एकूण ४० परदेशी नागरीकांचा समावेश आहे.

(३) राज्यात सन २०१७ मध्ये गांजा या अंमली पदार्थांचे ४९० गुन्हे दाखल असून त्यामध्ये एकुण ६७९ आरोपी अटक करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये ५ महिलांचा समावेश आहे. लहान मुलांचा वापर होत असलेली बाब निदर्शनास आलेली आहे.

(४) राज्यात अंमली पदार्थांची तस्करीस प्रतिबंध घालण्याकरीता शासनाने मुंबई शहरात स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेला आहे. राज्यात जिल्ह्याचे ठिकाणी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व पोलीस आयुक्तालयाच्या ठिकाणी गुन्हे शाखा येथे विशेष पथक नेमण्यात येऊन त्या मार्फत अंमली पदार्थांच्या चोरट्या व्यापारास आळा घालण्याकरीता कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

माथाडी कामगारांच्या विविध मागण्यांबाबत

(२५) * ३७७५० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथाडी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशानुसार तयार करण्यात आलेला कृती आराखडा प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कृती समिती स्थापन करण्याचाही निर्णय घेतला असून उक्त समितीची एकही बैठक आतापर्यंत झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, विविध माथाडी मंडळांवर चेअरमन आणि सेक्रेटरींची पूर्णवेळ नेमणूक करणे, माथाडी मंडळाच्या कार्यालयीन सेवेत माथाडी कामगारांच्या मुलांना प्राधान्य देणे, माथाडी मंडळावर युनियनच्या सभासद संख्येच्या प्रमाणात सदस्यांच्या नेमणूका करणे आदी मागणी संदर्भात मा.कामगार मंत्री संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन माथाडी कामगारांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन माथाडी कामगारांच्या विविध मागण्या सोडविण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक ०६/०९/२०१६ अन्वये कृती आराखडा करण्यात आला आहे.

(२) कृती आराखडयानुसार राज्यातील २९ जिल्हयात जिल्हास्तरीय कृती समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. उर्वरित जिल्हयांमध्ये कृती समिती त्वरित स्थापन करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. १५ जिल्हयामध्ये जिल्हास्तरीय कृती समितीच्या बैठकादेखील घेण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) हे खरे आहे.

मा.श्री.नरेंद्र पाटील, विधान परिषद सदस्य यांच्या दिनांक ०३/०१/२०१८ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने मा.मंत्री (कामगार) यांनी दिनांक ०८/०१/२०१८ व दिनांक १५/०१/२०१८ रोजी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित केली होती.

माथाडी मंडळांवरील चेअरमन व सचिवांची रिक्त पदे भरण्यासाठी अतिरिक्त पदांना आकृतिबंधात मंजूरी प्राप्त करुन घेवून त्यासाठी अनुक्रमे सहाय्यक कामगार आयुक्त व सरकारी कामगार अधिकारी ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याबाबतची कार्यवाही विचाराधीन आहे. अन्य मागण्यांबाबत नियमानुसार निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निवडीबाबत

(२६) * ३८२०८ ॲड.जयदेव गायकवाड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी खुल्या प्रवर्गातून परीक्षा देवून परीक्षा उत्तीर्ण झाले असता त्यांची निवड रद्द करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय होवू नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) हे खरे नाही, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून खुल्या प्रवर्गातील पदे भरताना सर्व प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात येतात. मात्र खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणाची पदे भरताना महिला, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, इ. फक्त खुल्या प्रवर्गातील अमागास उमेदवाराची शिफारस केली जात आहे. त्यामुळे खुल्या प्रवर्गात समांतर आरक्षणाची पदे भरताना गुणवत्तेनुसार पदे भरली जात नाही. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय व मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचे न्यायनिर्णय परस्पर विसंगत आहेत. तसेच याबाबतची अनेक प्रकरणे विविध न्यायालयात प्रलंबित/न्यायप्रविष्ट आहेत. उक्त वस्तुस्थिती विचारात घेता, कोणत्याही प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय होऊ नये यासाठी प्रचलित धोरणाचे पुनर्विलोकन करण्याची बाब शासनाचे विचाराधीन आहे.

पुणे महानगरपालिकेला शासनाकडून विविध अनुदान व मिळकत करापोटीची रक्कम मिळत नसल्याबाबत

(२७) * ३८७८४ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेला राज्य शासनाकडून विविध अनुदान व मिळकत करापोटीचे थकीत पावणे चारशे कोटी रुपये मिळत नसल्याने महानगरपालिकेची आर्थिक कोंडी होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाकडे पुणे महानगरपालिकेची असलेली थकीत रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

शासनाच्या अमृत, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनर्निर्माण योजना, वस्तु व सेवाकराचे भरपाई अनुदान, रस्ते विकास, मुद्रांक शुल्क इत्यादी योजना अन्वये पुणे महानगरपालिकेस अनुदानाचे वितरण वेळोवेळी करण्यात आले आहे. मिळकत कर ही महानगरपालिकेच्या अखत्यारीतील बाब असुन त्यास शासकीय अनुदान दिले जात नाही.

(२) महानगरपालिकांना विविध प्रयोजनासाठी कामाच्या/प्रयोजनाच्या टप्प्यानुसार निधी वितरीत करणे, त्याबाबतची उपयोगीता प्रमाणपत्रे मिळविणे व पुढील हप्त्याचा निधी मंजूर करणे, ही निरंतर चालणारी प्रक्रीया आहे. या अनुषंगाने पुणे महापालिकेकडून सविस्तर माहिती मिळवून देय अनुदान व प्रत्यक्ष दिलेले अनुदान याबाबतचा ताळमेळ घालण्यात येत आहे. अशा ताळमेळाच्याअंती काही अनुदान देय असल्याचे स्पष्ट झाल्यास ते वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेने युटिलिटी कंपनीकडून खरेदी केलेले पाईप गहाळ झाल्याबाबत

(२८) * ३८५६५ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने युटिलिटी कंपनीकडून खरेदी केलेल्या ३० कोटी रुपये किंमतीच्या पाईपपैकी १२ कोटी रुपये किंमतीचे पाईप गहाळ झाले असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

औरंगाबाद शहर समांतर पाणीपुरवठा योजना ही युटिलिटी कंपनीकडून ऑक्टोबर, २०१६ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेने ताब्यात घेतली आहे.

सदर योजनेसाठी संबंधित युटिलिटी कंपनीने खरेदी केलेल्या विविध व्यासाच्या पाईप्स नक्षत्रवाडी जलकुंभ परिसरामध्ये ठेवलेल्या होत्या.

सदर योजनेची कामे औरंगाबाद महानगरपालिकेने ताब्यात घेतल्यानंतर महानगरपालिकेने याबाबतचा रितसर पंचनामा करून सदर पाईप्स ताब्यात घेऊन महानगरपालिकेच्या वितरण व्यवस्थेच्या तीन उपविभागांना हस्तांतरीत केल्या आहेत.

सबब, औरंगाबाद महानगरपालिकेने औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीकडून ताब्यात घेतलेल्या पाईप्स गहाळ झाल्या नाहीत असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी शहरातील नियोजित ट्रक टर्मिनलच्या आरक्षित जमिनीबाबत

(२९) * ३८२४४ श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी शहरातील साळवी स्टोप येथे नियोजित ट्रक टर्मिनलसाठी आरक्षित जमीन मुळात २०० गुंठे असून त्याच्या ५०% जागेवर ट्रक टर्मिनल विकसित करून उर्वरित ५०% जागा विकासकाला असा शासनाचा नियम असताना १६१ गुंठ्यावरच आराखडा विकासाकडून दाखवला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित ३९ गुंठे जमिनीबाबत काय नियोजन आहे हे अनिश्चित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित भूखंड शासन कोणत्या कामाकरिता वापरणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) सदर जागा ही आ.क्र.११७ "ट्रक टर्मिनस" या प्रयोजनासाठी आरक्षित आहे. नगर भूमापन अधिकारी रत्नागिरी यांचेकडील मोजणी नकाशाच्या प्रतीवर सदर आरक्षणाचे क्षेत्र २०००० चौ.मी. (२-००-०० हे.आर) दर्शविले असले तरी रत्नागिरी शहराच्या मंजूर विकास योजनेच्या अहवालात उक्त आरक्षणाचे क्षेत्र १-६१-०० हे.आर दर्शविले आहे. त्यानुसार सदर १-६१-०० हे.आर क्षेत्र विचारात घेऊन त्या क्षेत्राचे स्थान व हद्दी निश्चित करून नगरपरिषदेने समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकास प्रस्तावावर कार्यवाही केली आहे.

(२) व (३) आरक्षणाखालील क्षेत्र खाजगी असून मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील समावेशक आरक्षणाचे तरतुदीनुसार विकसन परवानगी दिलेली आहे. या तरतुदीनुसार सदर आरक्षणाखालील क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रावर विकास योजनेतील लगतच्या वापराप्रमाणे रहिवास वापर अनुज्ञेय आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाबाबत

(३०) * ३९००४ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीतर्फे संचालन करणाऱ्या नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या खाजगीकरणाची प्रक्रिया मागील एक वर्षापासून सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रक्रियेत पात्र ठरलेल्या पाच कंपन्यांना देण्यात येणारा प्रारुप सवलती करारनामा आणि महसूल प्रस्ताव सदरहू कंपनीतर्फे मंजूरीसाठी शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रस्तावावर तात्काळ निर्णय घेऊन विमानतळाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर (MIHAN) चे उन्नतीकरण, आधुनिकीकरण, देखभाल ही कामे सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून (PPP) संकल्पना करणे, बांधणे, वित्त सहाय्य पुरविणे, चालविणे आणि हस्तांतर करणे (DBFOT) तत्वावर करण्यासाठी निर्गमित करावयाच्या Request for Proposal (RFP) व Concession Agreement (सवलत करारनामा) दस्तावेजांना दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय.

(३) यासंदर्भात, Request for Proposal (RFP) व Concession Agreement (सवलत करारनामा) दस्तावेज पात्र ठरलेल्या पाच कंपन्यांना निर्गमित करण्याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार महानगरपालिकेलगतच्या ग्रामपंचायतीना भोइदापाडा येथील डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यास परवानगी मिळणेबाबत

(३१) * ३७७३२ श्री.रविंद्र फाटक, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेलगतच्या ग्रामपंचायतीना मालकीची जागा उपलब्ध नसल्याने महानगरपालिकेच्या भोइदापाडा येथील डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यास परवानगी मिळणेबाबतची मागणी सदर ग्रामपंचायतीनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे चंद्रपाडा (ता.वसई, जि.पालघर) ग्रामपंचायतीने दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास याबाबतची मागणी आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा कचरा न उचलल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याने उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) चंद्रपाडा ग्रामसभेने त्यांच्या क्षेत्रातील निर्माण होणारा घनकचरा वसई विरार शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रात डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यासाठी मागितलेली परवानगी वसई विरार शहर महानगरपालिकेने नाकारली आहे.

वसई तालुक्यात महानगरपालिकेच्या क्षेत्राव्यतिरीक्त २१ ग्रामपंचायती जिल्हा परिषद, पालघर यांच्या अधिनस्त असून ग्रामपंचायती क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाची जबाबदारी संबधित ग्रामपचांयतीची आहे असे चंद्रपाडा ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद, पालघर यांना वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच याबाबत जिल्हा परिषदेने पुढाकार घेऊन घनकचरा व्यवस्थापन शास्त्रोक्त पध्दतीने करण्याबाबतच्या सूचना जिल्हा परिषद, पालघर यांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कुर्ला (प) येथे बांधकाम व्यावसायिकाने रहिवाशांची फसवणूक केल्याबाबत

(३२) * ३८४६२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला (प.) येथील भाग-४, न.भू.क्र.७१, ७७/१ ते २६२ च ७६, ७६/१ ते २७ या भूखंडावर सन २००१ मध्ये मे. रिझवी इस्टेट ॲण्ड हॉटेल्स प्रा.लि. बांधकाम व्यावसायिकाने तेथील रहिवाशी नागरीकांना विश्वासात न घेताच एसआरए स्कीम अंतर्गत मुनस्टार को.ऑ. हाऊसिंग सोसायटीच्या नावाखाली अनधिकृत इमारतीचे बांधकाम सुरु केले असल्याचे माहे ऑगस्ट, २००४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मे.अख्तर हसन रिझवी बांधकाम व्यावसायिकाने रहिवाशांची फसवणूक करुन अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी दिनांक १२ सप्टेंबर, २००४ रोजी वा त्यासुमारास कुर्ला पोलीस ठाणे येथे पोलीस तक्रार नोंदविल्याचे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण वांद्रे, मुंबई यांचेकडे वारंवार विनंती अर्ज केल्याचे व मा.विरोधी पक्षनेते (विधानसभा) यांनीही दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा

त्यासुमारास या प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्र देऊन कारवाईची मागणी केली असूनही काहीही कारवाई झाली नसल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बेकायदेशीर बांधकामाप्रकरणी एसआरएचे अधिकारी, महानगरपालिका अधिकारी व पोलीस यंत्रणा बांधकाम व्यावसायिकास पाठीशी घालीत असल्यामुळे अद्याप कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तेथील रहिवाशी नागरीक व लोकप्रतिनिधींनी लेखी स्वरुपात संबंधितांकडे तक्रार निवेदने देऊनही कारवाई न होण्याची कारणे काय आहेत व त्यास कोणकोण जबाबदार आहे तसेच बेकायदेशीररित्या केलेले इमारतीचे बांधकाम जमीनदोस्त करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) हे खरे नाही.

सदर प्रकल्पातील संयुक्त (Composite) इमारत क्र.०१ (मुनस्टार) विंग A ला जोत्यापर्यंत बांधकाम परवानगी १२/१०/२००१ व विंग B ला जोत्यापर्यंत बांधकाम परवानगी १४/०३/२००१ ला दिलेली असून पुढील बांधकाम परवानगी दिनांक २४/०४/२००१, १२/१०/२००१, ०९/११/२००१ व पूर्ण बांधकाम परवानगी २३/०९/२००४ रोजी देण्यात आलेली आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकाम झाले नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(२) योजनेतील काही रहिवाश्यांनी १२ सप्टेंबर, २००४ रोजी व त्यासुमारास कुर्ला पोलीस ठाणे येथे मे. अख्तर हसन रिझवी या बांधकाम व्यावसायिकाविरुध्द तक्रार नोंदविली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आरोपी बांधकाम विकासकाविरुध्द दाखल करण्यात आलेला गुन्हा महानगर दंडाधिकारी, ५१ वे न्यायालय, कुर्ला मुंबई यांनी दिनांक ०९/०६/२०१६ रोजी निकाली काढला असून संबंधित बांधकाम विकासकाची निर्दोष मुक्तता केली असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील महानगरपालिका रुग्णालये तसेच प्रसुतीगृहांमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्याबाबत

(३३) * ३८३६९ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रविण दरेकर, श्री.जनार्दन चांदूरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिका रुग्णालये तसेच प्रसुतीगृहांमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार महानगरपालिका रुग्णालये व प्रसुतीगृहांमध्ये तात्काळ अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ५ प्रमुख रुग्णालयांमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून कुपर आणि नायर दंत रुग्णालयास अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १६ उपनगरीय रुग्णालयांपैकी ३ रुग्णालयांना अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणापत्र प्राप्त आहेत.

१२ रुग्णालयांनी ना-हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे व अग्निशमन दलाने निदर्शनास आणलेल्या त्रुटींची पूर्तता संबंधित रुग्णालयांकडून करण्यात येत आहे.

एका रुग्णालयाचे दुरुस्तीचे काम सुरु असून, दुरुस्तीनंतर ना-हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यात येणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील २९ प्रसुतीगृहे, १७५ दवाखाने व ५ विशेष रुग्णालयांना पुरेशा प्रमाणात अग्निसुरक्षा यंत्रे उपलब्ध आहेत.

(३) व (४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ५ प्रमुख रुग्णालयांसह ५ विशेष रुग्णालये, १६ उपनगरीय रुग्णालये व २९ प्रसुतीगृहांमध्ये अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आल्या आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ५ प्रमुख रुग्णालयांच्या इमारतीस आग लागण्याचे संभाव्य धोके लक्षात घेता, त्वरीत प्रतिसादाकरिता रंगीत तालीम, कर्मचाऱ्यांकरिता जाणीव जागृतीचे विशेष कार्यक्रम हे सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालय आपत्कालीन समितीद्वारे करण्याची योजना कार्यान्वित आहे.

लोहा (जि.नांदेड) येथील पोलीस ठाण्याच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

(३४) * ३८५४६ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील पोलीस ठाण्याच्या नुतन इमारतीच्या बांधकामासाठी गृह विभागाकडे रुपये ३५ लाखाचा निधीचा प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे सदर काम मागील चार वर्षापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड-लातूर राज्य महामार्गावरील लोहा हे प्रमुख बाजारपेठेचे शहर असून या पोलीस ठाण्यांतर्गत ३५ गावे येत असून सन २००९ मध्ये या कामाकरिता ३८ लाख रुपयांचा निधी मिळाला तद्नंतर निधी न मिळाल्याने हे काम अपुर्णावस्थेत असल्याने सध्या हे पोलीस ठाणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपुऱ्या जागेतच सुरु असल्याने सुविधा अभावी कार्यरत अधिकारी वा कर्मचारी यांची गैरसोय होत असल्याने याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) पोलीस स्टेशन लोहा, जि.नांदेड येथील इमारतीची दुरूस्ती व पुनर्बांधणी करणेसाठी आवश्यक रुपये ५२,२४,३७२/- इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दिनांक १३/०१/२०१० अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली व रुपये ५२.२४ लक्ष इतका निधी सन २०११ मध्ये दिला आहे. सदर इमारतीच्या कामासाठी आवश्यक अतिरिक्त निधीकरिता सुधारित प्रस्ताव सादर करणेबाबत क्षेत्रिय कार्यालयास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या समांतर आरक्षणासाठी काढलेल्या परिपत्रकाची चुकीची अंमलबजावणी होत असल्याबाबत

(३५) * ३८४०० श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या समांतर आरक्षणासाठी काढलेल्या परिपत्रकाची होणारी चुकीची अंमलबजावणी थांबवावी आणि त्याद्वारे झालेल्या सर्व भरती बेकायदेशीर ठरवून नव्याने परीक्षा घ्याव्यात, अशी मागणी स्पर्धा परीक्षेच्या उमेदवारांनी मा.सामाजिक न्याय राज्यमंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ च्या समान आरक्षणाबाबतच्या परिपत्रकाचा चुकीचा अर्थ लावून गुणवत्ता असलेल्या मागासवर्गीय माजी स्वातंत्र्य सैनिकाची खुल्या स्वतंत्र सैनिक प्रवर्गातून, मागासवर्गीय मुलींची खुल्या महिला प्रवर्गातून, मागासवर्गीय खेळाडूंची खुल्या खेळाडू प्रवर्गातून निवड केली जात नाही हे समानतेचा मुलभूत अधिकार आणि शासकीय नोकऱ्यांमधील समान संधी नाकारणे असाच होत असल्याने याबाबत राज्य शासनाने स्पष्ट निर्देश देण्याची मागणी युवा जनता दल युनायटेडच्या शिष्टमंडळाने मा.सामाजिक न्याय राज्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) हे खरे नाही. अशा प्रकारचे कोणतेही पत्र प्राप्त नाही. तथापि याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचे न्यायनिर्णय परस्पर विसंगत आहेत. तसेच याबाबतची अनेक प्रकरणे विविध न्यायालयात प्रलंबित/न्यायप्रविष्ट आहेत. उक्त वस्तुस्थिती विचारात घेता, कोणत्याही प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय होऊ नये यासाठी प्रचलीत धोरणाचे पुनर्विलोकन करण्याची बाब शासनाचे विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

परफेक्ट कन्स्ट्रक्शन्स या कंपनीच्या विकासकाने बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याबाबत

(३६) * ४०१३४ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत सी.टी.एस.क्र.४१ पै. गांव ओशिवरा, न्यु लिंक रोड, बेहरामबाग, जोगेश्वरी (प) मुंबई - ४००१०२ येथे परफेक्ट कन्स्ट्रक्शन्स या कंपनीच्या विकासकाने बनावट कागदपत्रांच्या आधारे १२६ व्यावसायिक गाळ्याच्या ७ मजल्याच्या दोन इमारतीचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित विकासकावर डी.एन.नगर व ओशिवरा पोलीस ठाण्यामध्ये अनेक तक्रारी दाखल करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार याप्रकरणात दोषी असलेल्या विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) हे खरे नाही असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(२) अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त नसल्याचा संबंधित पोलीस ठाण्याचा अहवाल आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गेवराई (जि.बीड) नगरपालिकेच्या व्यापारी गाळे वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

(३७) * ४०१७३ श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) नगरपालिकेच्या पहिल्या मजल्यावरील व्यापारी गाळे वाटप करताना संबंधितानी गैरव्यवहार केल्यामुळे नगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत श्री.मनोहर चाळक यांनी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषी अधिकारी व इतर यांचेविरुद्ध कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुख्याधिकारी, गेवराई नगरपालिका यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पुन्हा जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास चार दिवसात चौकशी अहवाल सादर करण्याच्या सूचना देऊन विलंब झाल्याची जबाबदारी मुख्याधिकारी, गेवराई नगरपालिका यांचेवर निश्चित केली जाईल असे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक २७/०३/२०१७ च्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करण्याबाबत मुख्याधिकारी, गेवराई नगरपरिषद यांना कळविले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नगरपरिषदेच्या नविन इमारतीच्या दर्शनी भागासमोरील ८ जुन्या व्यापारी गाळेधारकांना नविन इमारतीच्या तळमजल्यावर नगरपरिषदेने केलेल्या ठरावानुसार तात्पूरते गाळे देण्यात आले आहेत. उर्वरित १७ गाळ्यांबाबत विहीत मार्गाने पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे, असे गेवराई नगरपरिषदेने कळविले आहे.

तथापि, सदर प्रकरणी चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास ४ आठवड्यात सादर करण्याचे जिल्हाधिकारी, बीड यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अमळनेर (जि.जळगाव) येथील पोलीस स्टेशनचे विभाजन करण्याबाबत

(३८) * ४०१८३ श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगाव) येथील पोलीस स्टेशनचे विभाजन करून ग्रामीण व शहर पोलीस स्टेशन स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमळनेर येथील पोलीस स्टेशनमध्ये मंजुर पोलीस कर्मचारी संख्या १०२ असताना ५५ कर्मचारी कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग (१) मधील प्रस्तावाच्या अनुषंगाने व पोलिसांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) राज्य पोलीस दलामधील पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्याच्या प्रस्तावामध्ये पोलीस अधिक्षक, जळगाव यांच्या आस्थापनेवरील अंमळनेर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन अंमळनेर ग्रामीण पोलीस ठाणे निर्माण करण्याची बाब समाविष्ट करण्यात आली आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला असता त्यावर वित्त विभागाने त्यांच्या दिनांक २५/०५/२०१७ च्या शासन निर्णयानुसार राज्य पोलीस दलाचा आकृतिबंध निश्चित करुन प्रस्ताव फेरसादर करावा, असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) अंमळनेर पोलीस ठाण्याकरीता पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची ९८ पदे मंजूर असून सद्यःस्थितीत ६५ पोलीस अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

(३) पोलीस अधिक्षक, जळगाव यांच्या आस्थापनेवरील अंमळनेर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन अंमळनेर ग्रामीण पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतच्या प्रस्तावावर वित्त विभागाने उपरोक्त प्रमाणे दिलेल्या अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्य पोलीस दलामधील पोलीस शिपायांची दिनांक ३१/१२/२०१८ पर्यंत रिक्त असलेली सर्व पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पोलीस शिपायांची रिक्त पदे भरण्यासाठी पोलीस भरती, २०१८ बाबत जाहिरात प्रसिद्ध केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील होमगार्डसना कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेण्याबाबत

(३९) * ४०२३४ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे ६० हजारांपेक्षा अधिक कार्यरत असलेले होमगार्डस तुटपुंज्या वेतनावर (म्हणजेच प्रत्येक दिवसाला १७५ रुपये भत्ता) काम करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर होमगार्डसना संपूर्ण महिनाभरात कधी कधी १० दिवस तर कधी कधी ३-४ दिवस काम करुनही कामाचा मोबदला ६-६ महिने मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश व झारखंड या राज्यात होमगार्डसना कायमस्वरुपी पोलीस ठाण्यावर बंदोबस्तासाठी ठेऊन मासिक वेतन दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील होमगार्डयांना उपरोक्त राज्याप्रमाणे कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेऊन रुपये १० हजार मासिक वेतन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रस्तावावर अंमलबजावणी केंव्हापर्यंत होणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) विविध सण, उत्सव, यात्रा तसेच अन्य नैसर्गिक व मानव निर्मित आपत्ती दरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस महासंचालक, मुंबई यांच्या मागणीनुसार पोलीस दलास सहाय्यार्थ होमगार्ड यांना पाचारण केले जाते. कर्तव्यावरील तैनात होमगार्ड यांना पोलीस विभागाकडून प्राप्त कर्तव्य प्रमाणपत्रे प्राप्त होताच देय भत्त्यांचे प्रदान तात्काळ करण्यात येते.

(३) या अनुषंगाने उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश व झारखंड यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आली होती. तथापि, मध्यप्रदेश व झारखंड यांच्याकडून माहिती अप्राप्त आहे. उत्तरप्रदेश यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार उत्तरप्रदेश येथील पटावरील ७५००० होमगार्ड पोलीस विभागाकडे प्रतिदिन रुपये ३७५/- मानधनावर व १०००० होमगार्ड निमशासकीय व शासकीय कंपन्या येथे प्रतिदिन रुपये ३८५/- मानधनावर कर्तव्य करीत आहेत.

(४) असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या खुल्या परिसरात ठेवण्यात आलेल्या स्फोटकाचा स्फोट होऊन मुलाचा मृत्यू झाल्याबाबत

(४०) * ४०३७८ श्री.हरिसिंग राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या खुल्या परिसरात ठेवण्यात आलेल्या स्फोटकाचा स्फोट होऊन माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अरिहंत राजेश सिंह हा ९ वर्षाचा मुलगा जखमी होऊन काही दिवसात त्याचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटात अन्य दोन मुले जखमी झाले तसेच अरिहंत हा मुलगा ५५ टक्के भाजला असताना डॉक्टरांचा निष्काळजीपणा व चुकीच्या उपचारामुळे त्याचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकरणास कारणीभूत असलेल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर तसेच नॅशनल बर्न हॉस्पिटलच्या संबंधित डॉक्टरांवर त्यानुषंगाने सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळ प्रतिबंधित क्षेत्रात असलेल्या किटकनाशकाच्या ड्रमचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत दिनांक १७ सप्टेंबर, २०१७ रोजी, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला व दोन विद्यार्थी जखमी झाले ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, त्या विद्यार्थ्याचा मृत्यू डॉक्टरांचा निष्काळजीपणा व चुकीच्या उपचारामुळे झाल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेले नाही.

(३) सदर प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, काही मुलांनी लावलेल्या आगीमुळे किटकनाशक ड्रमचा स्फोट झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच, सदर प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी दोषी आढळून आले नसल्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्यात आली नाही.

सदर प्रकरणी उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २१७/२०१७, भादंवि कलम ३०४(अ), ३३७ अन्वये दिनांक ०६/१०/२०१७ रोजी अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

यशवंत वैभव टॉवरच्या बांधकामाला बनावट बांधकाम परवानगी व बिनशेती परवानगी दिल्याबाबत

(४१) * ४०६०३ श्री.कपिल पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंत वैभव टॉवरच्या बांधकामाला बनावट बांधकाम परवानगी व बिनशेती परवानगी दिल्याबाबत जिनेंद्र विकासकाचे भागीदार श्री.उमेश दत्तात्रय नाईक, श्री.प्रदिप गुप्ता व श्री.पराग लधानी आणि इतर यांच्यावर श्री.गोविंदा गुंजाळकर यांनी दिनांक २२ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास तुळीज पोलीस ठाणे, वसई येथे फौजदारी गुन्हा दाखल केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अद्‌याप कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती कालावधीत चौकशी करण्यात येईल, चौकशीअंती दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) यशवंत वैभव टॉवरच्या संदर्भात वृत्तपत्रातील बातमी तसेच, प्राप्त तक्रारीच्या संदर्भात पोलीस चौकशीच्या अनुषंगाने सदर बिनशेती आदेश हे सकृतदर्शनी बनावट असल्याचे दिसून येत आहे. तथापि, या संदर्भात जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडून यासंदर्भातील अभिलेखांची छाननी करण्यात येत असून त्यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या अंतिम अहवालानंतर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कौशल्य विकास विभागातील शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

(४२) * ३८००८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेंतर्गत युवकांना औद्योगिक प्रशिक्षण देण्याचा मानस व्यक्त केला असतांनाच राज्यातील कौशल्य विकास विभागातील शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील अनेक पदे रिक्त असल्याने ही योजना राबविण्यास अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्किल इंडिया कार्यक्रमांतर्गत देशभर कौशल्य विकास केंद्र सुरु करण्यात येत असून राज्यात अस्तित्वात असलेल्या कौशल्य विकास विभागातील निदेशकांची पदेही भरण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पदे रिक्त असल्याने दरवर्षी १४ हजार याप्रमाणे मागील तीन वर्षात हजारो विद्यार्थी कौशल्य विकास प्रशिक्षणापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कौशल्य विकास विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे,

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत शिल्प निदेशकांची एकूण ५२९९ मंजूर पदांपैकी ३६७९ पदे भरलेली असून १६२० पदे रिक्त आहेत. शिक्षक व शिक्षकेतर रिक्त पदे भरण्यासाठी सन २०१४ मध्ये ७०२ पदांकरिता जाहिरात देण्यात आली होती. त्यापैकी शिल्प निदेशक पदाच्या एकूण २८० पदांसाठी दिलेली जाहिरात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक २२/०८/२०१७ चे आदेशान्वये रद्द केली आहे. त्यानुसार शिल्प निदेशक पदे वगळून उर्वरित ४२२ पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्याची प्रक्रिया प्रादेशिक कार्यालयाच्या स्तरावर करण्यात आली असून सदर भरतीप्रक्रिया जवळपास पूर्ण झाली आहे.

(३) हे खरे नाही,

प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून संस्था स्तरावरील शिल्प निदेशकांच्या रिक्त पदांवर तासिका तत्वावर पर्यायी शिक्षकांची नेमणुक संस्थास्तरावरुन करण्यात आली असून विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरु आहे. त्यामुळे विद्यार्थी कौशल्य विकास प्रशिक्षणापासून वंचित राहिलेले नाहीत. राज्यातील ४१७ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील मागील ३ वर्षांतील प्रवेशाची स्थिती खालील प्रमाणे आहे :-

अ.क्र.	वर्ष	उपलब्ध जागा	प्रवेश	प्रवेशाची टक्केवारी
१	२०१५	९२१५५	८०२५४	८७%
२	२०१६	८९६५८	८५१९२	९५%
३	२०१७	९३४८१	८६२११	९२%

(४) व (५) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध मंजूर करण्याबाबतची कार्यवाही वित्त विभागाच्या सल्ल्याने सुरू आहे. आकृतिबंध मंजूर झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

ग्रँटरोड, मुंबई येथील क्रिडांगणासाठी आरक्षित असलेला भूखंड परत घेण्याबाबत

(४३) * ३८९०७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रँटरोड, मुंबई येथील क्रिडांगणासाठी आरक्षित असलेला ५०० चौरस मीटरचा भूखंड (आयओडी क्रमांक EB/६६०/DA) एका विकासकास महापालिकेने दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर विकासकाला दिलेला भूखंड परत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) ते (३) अशी बाब नाही.

यासंदर्भात गिरगांव विभागातील भूखंड क्र.११९१, १/११९१, २/११९१, ४/११९१, ११९२, १/११९२, ११९३ व ११९४ मधील उपकरप्राप्त इमारतींच्या विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३(७) च्या पुनर्विकास प्रकल्पामध्ये नियमानुसार क्रिडांगणासाठी आरक्षित क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्र क्रिडांगणासाठी दर्शवून बृहन्मुंबई महानगरपालिकेने नकाशे मंजूर केलेले आहेत. सबब विकासकास भूखंड देण्याची बाब उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील बी.ओ.टी. प्रकल्पांचे अहवाल सादर करण्याबाबत

(४४) * ३८०१३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील १२ बी.ओ.टी. प्रकल्पांची सर्वांगीण चौकशी करून अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना शासनाने दिनांक ८ जुलै, २०१३ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आदेशित केल्यानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी चौकशी करून एक महिन्यात अहवाल सादर करणे अपेक्षित असतानाही विभागीय आयुक्तांकडून पत्र प्राप्त न झाल्यामुळे शासनाने दिनांक २५ नोव्हेंबर, २०१३, दिनांक २० जानेवारी, २०१४ व दिनांक ३० मे, २०१५ च्या पत्राद्वारे व दिनांक १७ जुलै, २०१५ च्या अर्धशासकीय पत्रान्वये चौकशी अहवाल सादर करण्याची विनंती करण्यात आली तरीही अहवाल प्राप्त न झाल्याने दिनांक ७ जुलै, २०१६, दिनांक १ मार्च, २०१७ व दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी स्मरणपत्रे पाठवून अहवाल शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून पत्र, अर्धशासकीय पत्र तसेच स्मरणपत्रे पाठवूनही विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडून अहवाल शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील १२ बी.ओ.टी. प्रकल्पांच्या सर्वांगीण चौकशीचा अहवाल पाठविण्यास झालेल्या दिरंगाई बाबतीत संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) दिनांक ८ जुलै, २०१३ रोजीच्या शासन पत्रान्वये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या ७ बी.ओ.टी. प्रकल्पांची सर्वांगीण चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना दिले आहेत, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील तत्कालीन सहायक प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमली. सदर समितीमार्फत प्रकरणाची चौकशी पूर्ण झालेली असून त्यांचा अहवाल दिनांक २२/०२/२०१८ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाची छाननी करून आवश्यकतेनुसार संबंधितांवर कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात वाढीव चटईक्षेत्र मंजूर करुन संबंधित विकासकाकडून अधिमुल्य वसूल करण्याच्या निर्णयाबाबत

(४५) * ३८४४४ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात ०.५० (१/२) इतके वाढीव चटईक्षेत्र मंजूर करुन संबंधित विकासकाकडून त्याबदल्यात अधिमुल्य वसूल करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिमुल्याव्दारे वसूल होणारा महसूल अनेक वर्षे प्रलंबित असलेला धारावी पुनर्विकास प्रकल्प आणि वांद्रे-वर्सोवा सागरी मार्ग यासाठी वापरण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकाकडून वसूल करण्यात येणारे अधिमुल्य सदनिका विकत घेणाऱ्याकडून संबंधित विकासक वसूल करणार असून घराच्या किंमतीत वाढ होणार असल्याने विकासकाकडून अधिमुल्य वसूल करण्याचा निर्णय शासन रद्द करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये मुंबई उपनगरामध्ये बेसिक चटई निर्देशांकाचे वर अधिमुल्याची आकारणी करुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्याची तसेच जमा होणाऱ्या अधिमुल्याची रक्कम पायाभूत सुविधांसाठी वापरण्याची तरतूद आहे. तशी तरतूद मुंबई बेट शहरामध्ये नसल्याने त्याकरिता विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आलेल्या असून दिनांक ८ जानेवारी २०१८ रोजीच्या सूचनेन्वये नागरिकांच्या सूचना/हरकती मागविण्यात आलेल्या आहेत. याबाबत वैधानिक कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अंतिम निर्णय शासनाकडून संकल्पित आहे. मूळ चटई क्षेत्र निर्देशांकावर सदनिकांच्या उपलब्धतेसाठी सदर अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक असल्याने व त्यापोटी आकारणेत आलेल्या अधिमुल्याच्या रक्कमेमधून पायाभूत सुविधा उभारल्या जाणार असल्याने अधिमुल्य वसुलीची बाब रद्द करण्याचे शासनस्तरावर विचाराधीन नाही.

पुणे-मुंबई दरम्यान "हायपर लूप" ही अत्याधुनिक यंत्रणा उभारण्याबाबत

(४६) * ३९९३० श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-मुंबई दरम्यान "हायपर लूप" या अत्याधुनिक यंत्रणेच्या माध्यमातून अवघ्या चौदा मिनिटात प्रवास करता येणे शक्य असल्याचा पूर्ण व्यवहार्यता अहवाल (प्री-फिजिबिलीटी स्टडी) पीएमआरडीएला "हायपर लूप वन" या कंपनीने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला असून सदर अहवाल पीएमआरडीएने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनामार्फत “पीएमआरडीए” आणि “हायपर लूप वन” कंपनी यांच्यात पुणे-मुंबई दरम्यान पूर्व व्यवहार्यता पाहणीसाठी सन २०१७ मध्ये करार करण्यात आलेला असून उक्त कंपनीच्या प्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पुणे येथे येऊन विविध बाबींची पाहणी केलेली आहे तसेच एमएमआरडीए, एमएसआरडीसी, जवाहलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी), हायस्पीड रेल कार्पोरेशन (एचएसआरसी) यासह विविध संस्थांकडील माहिती आणि आकडेवारी संकलित करुन उक्त अहवाल सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संपूर्ण प्रकल्पाचा सविस्तर आराखडा करण्याचा निर्णय राज्य शासनामार्फत घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अहवालाचे व त्यानुषंगाने राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाचे स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे, तसेच प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे व त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय,

(३) सदर प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल (Feasibility Report) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर तयार करून घेण्यात येत आहे. सदर प्रकल्प सुसाध्य आढळून आल्यास सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेण्याचे नियोजित आहे.

(४) प्रथम टप्प्यामध्ये पुणे ते पुरंदर व पुणे ते मुंबई (दादर) या दोन मार्गांवर हायपर लूप तज्ञांच्या शक्यशक्यतेचा अभ्यास करणे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित आहे. सदरहू पूर्व सुसाध्यता अभ्यास करणेसाठी “हायपर लूप वन” डेलवार, अमेरिका या अमेरिकन कंपनीबरोबर सामंजस्य करार दिनांक १५/११/२०१७ रोजी करण्यात आला होता. सदर अहवाल हा सुसाध्यता अहवाल यास्वरूपात राहील. तसेच सुसाध्यता अहवालातील शिफारशीनंतर प्रकल्पाचे स्वरूप निश्चित होईल.

(५) सुसाध्यता अहवालानुसार या प्रकल्पासाठी आवश्यक निधीची उभारणी व प्रकल्प अंमलबजावणीचा कालावधी हा सुसाध्यता अहवालातील शिफारशीनुसार निर्णय घेण्याचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मिसा कायदयांतर्गत तुरुंगवास भोगलेल्या राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांना मासिक मानधन देण्याबाबत

(४७) * ३७८८९ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, श्री.रामराव वडकुते, श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिसा कायदयांतर्गत सन १९७५ मध्ये तुरुंगवास भोगलेल्या राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांना मासिक मानधन देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यकर्त्यांना किती मासिक मानधन देण्यात येणार आहे, याबाबत कोणते निकष लावण्यात येणार आहेत व या निकषाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याकरीता शासनाला प्रत्येक वर्षाला किती खर्च येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) दिनांक ०२/०१/२०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या विषयावरील धोरण ठरविण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णय घेतला असून सदर समिती याबाबत निकष ठरविणार आहे.
(३) माहिती संकलित करुन परिगणना करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथे केंद्र शासनाच्या उडान योजनेंतर्गत नियमित विमानसेवा सुरु करण्याबाबत

(४८) * ३७७८१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे केंद्र शासनाच्या उडान योजनेंतर्गत नियमित विमानसेवा सुरु करण्याची घोषणा शासनाने केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तावित विमानसेवा अदयाप सुरु करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर हे पर्यटनाच्यादृष्टीने महत्वाचे शहर असल्याने लाखोच्या संख्येने पर्यटक येत असल्याने दळवळणाच्या सोयीसाठी शासनाच्या प्रस्तावित असलेल्या उडान योजनेंतर्गत सदरील विमानतळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) होय.
(३) यासंदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पंतप्रधान आवास योजनेंतर्गत झोपडपट्टीवासीयांना ३०५ चौ.फुटाचे घर देण्याबाबत

(४९) * ३७९८६ ॲड.अनिल परब, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे या योजनेशी राज्याचे धोरण सुसंगत असावे यादृष्टीकोनातून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून झोपडपट्टीवासीयांना २६९ चौ.फुटाऐवजी ३०५ चौ.फुटाचे घर देण्याबाबत शासनाने मागविलेला व्यवहार्य अहवाल माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार झोपडपट्टीवासीयांना ३०५ चौ.फुटाचे घर देण्याबाबत शासन निर्णय जारी करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसनाला प्रोत्साहन व उत्तेजन देऊन सदर योजनेची गती वाढविण्यासाठी ३०५ चौ.फुटाचे घर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) दिनांक १०/०१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या सदनिकांच्या आकारमानात सुसंगत वाढ करावयाची झाल्यास सद्य:स्थितीत मंजूर व बांधकाम चालू असलेल्या तसेच नव्याने सादर होणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांवर होणाऱ्या विविध परिणामांचा अभ्यास करुन विश्लेष्णात्मक अहवाल (Impact Anaylsis) तयार करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. समितीने ३ महिन्यांच्या आत अहवाल शासनास सादर करावयाचा आहे.

(२) सदर समितीची कार्यवाही सुरु असून समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

येवला (जि.नाशिक) तालुक्यातील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांवरील गंभीर गुन्हे मागे घेण्याबाबत

(५०) * ३९२४७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांवर कलम ३०७, ३९४ व ३९५ अन्वये दाखल केलेले गुन्हे मागे घेण्यासाठी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास दिलेल्या निदेशानुसार पोलीस अधिक्षक, नाशिक यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावानुसार येवला तालुक्यातील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांवरील गंभीर गुन्हे मागे घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून दिनांक ३०/८/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३२१ नुसार राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत गठीत करण्यात आलेल्या मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या विचारार्थ ठेवणे प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोपरी, ठाणे (पुर्व) परिसरात वाहतुक कोंडी होत असल्याबाबत

(५१) * ३८८०० ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरी, ठाणे (पुर्व) परिसरात शहराच्या बाह्य भागातून ठाणे स्थानकापर्यंत बेकायदा प्रवासी वाहतुक करणाऱ्या खाजगी बसगाडयांमुळे वाहतुक कोंडी होत असल्याने त्याविरोधात परिसरातील नागरिकांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान खाजगी बसेसविरुध्द आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात आंदोलन करुन प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे वाहतुक पोलीस विभाग, ठाणे महानगरपालिका प्रशासन यांचेमार्फत कोणतीही कारवाई झाली नसल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार संबंधित महानगरपालिका परिवहन विभाग, पोलीस परिवहन विभाग तसेच प्रादेशिक परिवहन विभाग, ठाणे या यंत्रणाच्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

ठाणे शहर वाहतुक विभागाच्या हद्दीत वाहतुक नियमन तसेच वाहतुक हद्दीत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कसूरदार वाहनचालकांविरुध्द दैनंदिन कायदेशीर कारवाई करण्यात येत असून त्यात अवैध प्रवासी वाहतुक करणाऱ्या खाजगी बस चालकांविरुध्द देखील कारवाई करण्यात येते. सन २०१६ व सन २०१७ या दोन वर्षात अवैध प्रवासी वाहतुक करणाऱ्या कसूरदार वाहनचालकांविरुध्द अनुक्रमे २०१ व १८३ इतक्या केसेस दाखल करण्यात आल्या असून त्यांचेमार्फत अनुक्रमे रुपये ३,५७,०००/- व रुपये २,३२,८०० इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

खाजगी प्रवासी वाहतुक करणाऱ्या बसेसमधून अवैध प्रवासी वाहतुक होणार नाही तसेच वाहतुक सुनिश्चित होण्याच्यादृष्टीने कोपरी वाहतुक उपविभागाच्या हद्दीत हासिजा कॉर्नर येथे ट्रॅफिक बुथ ठेवण्यात आला आहे. तेथे नियमित वाहतुक नियमनासाठी पोलीस कर्मचारी कर्तव्यार्थ नेमण्यात येतात.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत वेळोवेळी अवैध प्रवासी वाहतुकीविरुध्द कारवाई केली जाते. याबाबतचा गत दोन वर्षांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

सन	तपासलेली वाहने	दोषी वाहने	एकूण वसूली	अनुज्ञप्ती निलंबन	परवाना निलंबन
२०१५-१६	२२३९	८१५	रुपये २.१५ कोटी	२७६	३४२
२०१६-१७	४१०३	९८४	रुपये १.५२ कोटी	२७१	२३६

उपरोक्त आंदोलनाच्या अनुषंगाने नागरीकांची गैरसोय होऊ नये याकरीता ठाणे परिवहन सेवेच्या वतीने कोपरी मार्गावरील बसफेऱ्या वाढविण्यात आल्या आहेत. त्यानुसार माहे मार्च, २०१७ मध्ये कोपरी स्थानक येथून सरासरी प्रतिदिन ३८५ इतक्या बसफेऱ्या व माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये सरासरी प्रतिदिन ३३१ बसफेऱ्या चालविण्यात आल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

रायगड जिल्ह्यात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

(५२) * ३८६८६ श्री.जयंत पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग, कर्जत व महाड (जि.रायगड) तालुक्यात दिनांक २५ ते २८ डिसेंबर, २०१७ या कालावधीत चोरीच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २७ व २८ डिसेंबर, २०१७ या दोन दिवसात रोख रक्कम व सोन्याचे दागिने अशी ९ लाख ८६ हजार रूपयांच्या ऐवजाची चोरी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यात दिवसेंदिवस चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) दिनांक २५ ते २८ डिसेंबर, २०१७ या कालावधीत एकूण १२ गुन्हे घडले आहेत.

(२) रायगड जिल्हयातील अलिबाग, कर्जत व महाड या तालुक्यात दिनांक २७ व २८ डिसेंबर, २०१७ या दोन दिवसात मालमत्तेच्या संदर्भात एकूण ४ गुन्हे घडले असून सदर गुन्हयांमध्ये एकूण ३,२९,५००/- रूपये त्यात रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा ऐवज चोरीस गेला आहे.

(३) रायगड जिल्हयात चोरीच्या घटनांना आळा घालणेसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.

अ) रात्रीच्या वेळी जास्तीत जास्त नाकाबंदी लावून रस्त्यावरील ईसमांना चेक केले जात आहे,

ब) पोलीस ठाणे हद्दीत रात्रीच्या वेळी जास्त पोलीस बंदोबस्त लावला जात आहे,

क) शहराच्या हद्दीत २४ तास गस्तीकरीता बिट मार्शल नेमले असून चैन स्नॅचिंग सारख्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी दामिनी पथकाची नेमणूक केली आहे.

ड) रेकॉर्डवरील आरोपीत यांना नियमितपणे चेक करण्यात येते व जेलमधून सुटणाऱ्या आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.

इ) शहरांमधील सोसायटींना सुरक्षारक्षक नेमणेबाबत व सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे माजी व्यस्थापकीय संचालकाची चौकशी करण्याबाबत

(५३) * ३९७१४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड : तारांकित प्रश्न क्रमांक ३५५०५ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे माजी व्यवस्थापकीय संचालक श्री.मोपलवार यांच्यावर सन २०१७ मधील पावसाळी अधिवेशनात सभागृहात झालेल्या गैरव्यवहाराच्या आरोपांच्या अनुषंगाने दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास माजी मुख्य सचिव जॉनी जोसेफ यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नियुक्त समितीला कोणत्या मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करण्याचे आदेश काढण्यात आलेले होते व चौकशी समितीने शासनास सादर केलेल्या अहवालात काय निदर्शनास आले आहे,

(३) तसेच, उक्त अहवालाच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) चौकशी समितीला पुढीलप्रमाणे कार्यकक्षा नेमुन देण्यात आली होती-

१) विधिमंडळात सन २०१७ च्या पावसाळी अधिवेशनातील श्री.राधेश्याम एल. मोपलवार, भाप्रसे यांच्यावरील विविध आरोपांबाबतीतील चर्चेच्या वेळी नमूद, श्री.मोपलवार, व्यवस्थापकीय संचालक, एम.एस.आर.डी.सी. यांच्या संभाषणाच्या ऑडीयो क्लिप, सी.डी. आणि निवेदन यांची सत्यता व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुचविणे

२) श्री.मोपलवार यांनी एम.एस.आर.डी.सी येथे काम करीत असताना, समृध्दी महामार्ग व तत्सम इतर कामे हाताळलेली आहेत. या कामाचे वरील नमूद आरोपाशी काही संबंध आहेत काय याची पडताळणी करणे.

३) श्री.मोपलवार हे सी.बी.आय यांच्याकडे आरोपी आहेत व ते जामीनावर आहेत असे आरोप वर नमूद चर्चेदरम्यान करण्यात आले आहेत, या बाबीची वस्तुस्थितीदर्शक पडताळणी करणे.

४) चौकशी दरम्यान उपरोक्त नमूद मुद्यांव्यतिरिक्त शासनास द्यावयाचे असल्यास अन्य मुद्दे समितीने दिलेल्या अहवालानुसार श्री.मोपलवार यांच्याविरुध्द चौकशी समितीच्या कार्यकक्षेत असलेल्या आरोपाची सत्यता निष्पन्न होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षक विभागीय परीक्षेत पोलिसांनीच "मास कॉपी" केल्याबाबत

(५४) * ३८०५० श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतलेल्या पोलीस उपनिरीक्षक विभागीय परीक्षेत पोलिसांनीच "मास कॉपी" केल्याचा प्रकार निदर्शनास आला असून परीक्षार्थ्यांनी पुनर्परीक्षा घेण्याची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुनर्परीक्षा घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, अंशत: खरे आहे.

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय (मुख्य) परीक्षा २०१७ या परीक्षेत समूह चर्चा वा सामुदायिक कॉपी झाल्याच्या तक्रारी करुन पुनर्परीक्षा घेण्याची मागणी काही उमेदवारांकडून आयोगाकडे करण्यात आली आहे.

(२) व (३) उमेदवारांच्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने पुणे, नागपूर, औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालय व मुंबईतील संबंधित उपकेंद्रप्रमुख यांचेकडून अहवाल मागविला असता समूह चर्चा वा सामुदायिक कॉपी झाल्याचा कोणताही प्रकार झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे पुनर्परीक्षा घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मे.एम.एन.डी. ट्रेडर्स कॉर्पोरेशन, मुंबई कंपनीने कर चुकविल्याबाबत

(५५) * ३८५५२ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील फोर्ट भागातील डी.एन. रोडवरील मे. एम.एन.डी. ट्रेडर्स कॉर्पोरेशन कंपनीने वार्षिक लेखापरिक्षण अहवालात फेरफार करुन सुमारे सव्वा सात कोटी रुपयांचा कर चुकविला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीच्या मालकाने कर चुकवून शासनाची फसवणूक केल्याबाबतचा गुन्हा आझाद मैदान पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुन्हा नोंदवूनही अद्यापपर्यंत कोणालाही अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर चुकवेगिरी करणाऱ्या कंपनीच्या मालकावर तसेच त्यांना वाचविणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक ६/०१/२०१८ रोजी फिर्यादीने दिलेल्या तक्रार अर्जावरुन पाहिजे दोन आरोपीविरुध्द गु.र.क्र.१२/२०१८ कलम ४२०, भा.दं.वि. सह ७४(२) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर कायदा २००२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अद्यापपर्यंत झालेल्या तपासामध्ये आरोपीतांना वाचविण्यासंदर्भात कोणत्याही पोलिसांचा सहभाग दिसून आलेला नाही.

सदरचा गुन्हा तपासाधिन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

माढा (जि.सोलापूर) येथील शिवाजी चौकात वाहतुक कोंडी होत असल्याबाबत

(५६) * ३८३०५ श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) येथील शिवाजी चौकातील अवैध प्रवासी वाहतुक करणारी वाहने उभी करण्यात येत असल्यामुळे व फेरीवाल्यांमुळे त्याठिकाणी वाहतुक कोंडी होत असून शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर शहर व आसपास अनेक साखर कारखाने असून साखर कारखान्यांना ऊस पुरवठा करणाऱ्या वाहनांची नेहमी गर्दी असते तसेच याच परिसरात बसस्थानक, मुलांची व मुलींची प्राथमिक केंद्र शाळा, जिल्हा परिषद हायस्कूल, नगरपंचायत कार्यालय, शॉपिंग सेंटर असल्याने नागरिकांची व विदयार्थ्यांची वर्दळ असून अरुंद रस्त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे नाही. शिवाजी चौक हा शहरातील मुख्य चौक आहे. या ठिकाणी फेरीवाल्यांच्या निष्कासनासाठी नगरपालिका प्रशासनातर्फे शासनाच्या फेरीवाला धोरणाप्रमाणे कार्यवाही केली जाते. सदर ठिकाणी वाहतुक नियमनाकरीता दोन कर्मचारी कायमस्वरुपी नेमण्यात आलेले आहेत तर चार सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत. नजिकच्या कारखान्यांकडील ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांवर सदर ठिकाणी वाहने उभी करण्यास मनाई करण्यात आली आहे.

माढा पोलीस ठाण्यामार्फत अवैध प्रवासी वाहतुक करणारी वाहने व वाहतुक नियमांचे उल्लंघन कारणारे यांचेविरुध्द केलेली कारवाई पुढीलप्रमाणे आहे :-

सन २०१६		सन २०१७	
केसेस	दंड	केसेस	दंड
५८९	१,०८,६००	८६७	२,३४,५००

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पोलिसांकडील चारित्र्य पडताळणीचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याबाबत

(५७) * ३७७८५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहुराष्ट्रीय कंपनी, माहिती-तंत्रज्ञान कंपनी, शासकीय तसेच खाजगी कार्यालयापासून ते रखवालदार, हॉटेलमधील कर्मचारी तसेच मजूरांनी नोकरीसाठी केलेल्या अर्जाबरोबर पोलिसांकडील चारित्र्य पडताळणीचा अहवाल बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे पोलीस आयुक्तालयाने चारित्र्य पडताळणीकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यास माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील ऑनलाईन पध्दतीमुळे नागरिकांना चारित्र्य पडताळणीचा अहवाल किती कालावधीत प्राप्त होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) चारित्र्य पडताळणीबाबतचे अर्ज विविध आस्थापनेकडून प्राप्त झाल्यास, चारित्र्य पडताळणीच्या अहवालास अनुसरुन प्रमाणपत्र दिले जाते.

(२) अंशत: खरे आहे.

खाजगी कंपन्यांकडून प्राप्त होणाऱ्या चारित्र्य पडताळणीची प्रकरणे माहे डिसेंबर २०१७ पासून ऑनलाईन पध्दतीने स्विकारली जातात. तथापि, शासकीय व निमशासकीय कार्यालयाकडून प्राप्त होणाऱ्या चारित्र्य पडताळणीची प्रकरणे ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येत आहेत.

(३) खाजगी चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र देण्याचा कालावधी हा पोलीस स्टेशनचा अहवाल प्राप्त झाल्यापासून कार्यालयीन कामकाजाचे ३० दिवस तर शासकीय व निमशासकीय चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र देण्याचा कालावधी अर्ज प्रकरणांमध्ये प्राप्त झाल्यापासून ३० दिवस इतका आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील पुलाची वाडी येथील मुठा नदी पात्रात राडारोडा टाकल्याबाबत

(५८) * ३८७८१ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामधून वाहत असलेल्या मुळा-मुठा नदीपात्रामध्ये पुलाची वाडी येथील मुठा नदी पात्रात सुमारे १५ ते २० टन राडारोडा टाकला जात असल्याने नदी पात्राचे डंपिंग ग्राऊंड झाले असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) पुलाची वाडी येथील मुठा नदी लगत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन तर्फे मेट्रो रेलकरीता पिलर उभारण्यासाठी नदीच्या काठी खोदाईचे काम चालु असुन सदर खोदाईतील निघालेली वरच्या २० सें.मी. थरातील माती वेगळ्याने साठविण्यात येत आहे.

पिलरचे काम पूर्ण झाल्यावर अखेरच्या २० सें.मी. जाडीच्या थरातील माती भरण्यात येणार असून अतिरिक्त माती प्रत्यारोपण करण्यात येणाऱ्या २३ वृक्षांसाठी महामेट्रो तर्फे वापरण्याचे प्रयोजन आहे. २० सें.मी. थराव्यतिरिक्त खोलवर असलेली माती पीलरच्या खड्ड्यात पूनर्भरण करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात साठविण्यात येत आहे.

उर्वरित अतिरिक्त माती महामेट्रो मार्फत पुणे महानगरपालिकेच्या नियमानुसार इतरत्र भरावासाठी वापरण्यात येईल.

सदर माती नदीच्या पात्रात जाणार नाही याची दक्षता घेण्याबाबत पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आलेले आहे.

औरंगाबाद शहरातील पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनची दुरुस्ती करण्याबाबत

(५९) * ३८५७३ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील ११३ वार्डामध्ये सुमारे तीन हजाराहून अधिक पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन मधून गळती होत असल्याने ठिकठिकाणी पाणी साठून त्यापासून विविध रोग पसरुन नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत तसेच पाईपलाईनच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे नाही.

औरंगाबाद शहराची पाणीपुरवठा योजना महानगरपालिकेने दिनांक १/१०/२०१६ पासून कन्सेशनरकडून स्वत:च्या ताब्यात घेतली असून पाणीपुरवठा योजनेचे संचलन, देखभाल दुरुस्ती व दैनंदिन पाणीपुरवठा वितरण महानगरपालिके मार्फत करण्यात येते.

शहर वितरण प्रणाली अंतर्गत जुन्या झालेल्या जलवाहिन्याची देखभाल व दुरुस्ती महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या गुत्तेदारांमार्फत वेळोवेळी करण्यात येते.

औरंगाबाद शहर समांतर पाणी वाटप योजनेत अंतर्भूत असलेल्या पाईप्स वापरून शहरातील जुन्या झालेल्या जलवाहिन्या बदलण्यात आल्या आहेत.

जलवाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत असून, महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव आढळून आलेला नसल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

दापोली (जि.रत्नागिरी) येथील आझाद मैदानाचा विकास करण्याबाबत

(६०) * ३८२४९ श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील आझाद मैदानाचा विकास मागील अनेक वर्ष प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मैदान बस स्थानकाला लागून असून देखील त्याठिकाणी स्वच्छता राखली जात नाही, नागरिकांसाठी जॉगिंग ट्रॅक नाहीत, बसायला बाक नाहीत तसेच विविध खेळ खेळण्यासाठी उत्तम खेळपट्टीचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त इतिहासकालीन मैदानाचा आधुनिक विकास करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) दापोली नगरपंचायत शहर विकास योजना मंजूर असून सदरील आझाद मैदान भूखंडावर विकास आराखड्यामध्ये विविध आरक्षणे प्रस्तावित आहेत, हे खरे आहे.
(२) आझाद मैदान सद्यःस्थितीत दापोली नगरपंचायतीच्या ताब्यात नाही. तथापि, मैदान ताब्यात नसले तरी नगरपंचायतीमार्फत मैदानाची नियमीतपणे साफसफाई केली जाते.

आझाद मैदानाजवळ असलेले शौचालयाचे आरक्षण विकसित करुन सदर ठिकाणी नगरपंचायतीमार्फत सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम केले आहे.

मैदानाच्या ठिकाणी नागरिकांना बसण्यासाठी नगरपंचायतीमार्फत बेंचेस बसविण्यात आली आहेत.

मैदानामध्ये जॉगिंग ट्रॅक व खेळपट्टी नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(३) आझाद मैदानावरील आरक्षणाच्या जागा तूर्त महसूल विभागाच्या ताब्यात असून सदर जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत सुरु आहे. जागा नगरपंचायतीच्या ताब्यात आल्यानंतर सदरची आरक्षणे विकसित करण्याचे नगरपंचायतीचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बांधकाम क्षेत्रासह इतर सर्व क्षेत्रातील असंघटीत कामगारांना हक्काचे घर देण्याबाबत

(६१) * ३९०५२ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बांधकाम क्षेत्रासह इतर सर्व क्षेत्रातील असंघटीत कामगारांना हक्काचे घर देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेखाली लवकरच ५० हजार घरे बांधली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेसाठी शासनाने निधीची तरतूद करुन पुढील प्रक्रिया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ३/२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत केवळ बांधकाम क्षेत्रातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडील नोंदणीकृत पात्र कामगारांकरिता महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) हे खरे आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सन २०२२ पर्यंत १९.४० लक्ष घरकुलांच्या बांधणीचे उद्दीष्ट आहे. त्याअंतर्गत बांधकाम कामगारांसाठी योजनेनुसार प्रती वर्षी ५०००० घरकुले याप्रमाणे सन २०२२ पर्यंत एकूण २,५०,००० घरकुले उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.
(३) या योजनेंतर्गत पात्र ठरणाऱ्या नोंदीत बांधकाम कामगारांना केंद्र शासनाकडून रुपये १.५० लक्ष, राज्य शासनाकडून रुपये १.०० लक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून रुपये २.०० लक्ष अनुदान देण्यात येणार आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या हिश्श्याचे अनुदान प्राप्त करुन वितरणाबाबतची कार्यवाही करण्यासाठी गृहनिर्माण विभाग समन्वय संस्था (नोडल एजन्सी) म्हणून काम करणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) शहराच्या विकास आराखड्यामध्ये फेरबदल केल्याबाबत

(६२) * **३८५०६ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहराच्या विकास आराखड्यामध्ये मोठ्या प्रमाणात फेरबदल करून नवीन आराखडा प्रकाशित केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास आराखड्यानुसार लाखो कुटुंबांचे विस्थापन होत असल्याने नवीन विकास आराखड्यातील १४ आरक्षण बदल रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकास आराखड्यातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुचविलेले १४ आरक्षण बदल रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) उल्हासनगर शहराची सुधारित प्रारुप विकास योजना शासनाने दिनांक २१/०४/२०१७ च्या अधिसूचनेन्वये भागश: मंजूर केली असून सारभूत स्वरुपाचे बदल (ईपी) दिनांक २१/०४/२०१७ रोजी पुनर्प्रसिध्द करुन त्यावर हरकती/सूचना मागविण्यात आल्या आहेत. मा.लोकप्रतिनिधींचे दिनांक २६/१२/२०१७ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले असून, सदर निवेदनामध्ये उल्हासनगर शहराच्या विकास योजनेमधील बदलांबाबत हरकती घेण्यात आल्या आहेत. या मधील काही बदल मंजूर विकास योजनेमधील असून काही ईपी मधील आहेत. सदरचे निवेदन नियुक्त अधिकारी तथा सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग यांचेकडे पाठविण्यात आले आहे. सहसंचालक नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत ॲसिड हल्ल्यातील पिडीतेची एका महिलेने फसवणुक केल्याबाबत

(६३) * ३८९७४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत ॲसिड हल्ल्यातील पिडीतेच्या मदतीसाठी पैसे जमा करुन तिला ही रक्कम न दिल्याने वांद्रे पोलीस ठाण्यात दिल्लीतील एका प्रसिध्द स्वंयसेवी संस्थेच्या संस्थापक महिले विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोपी महिलेने मुंबईतील ७ ॲसिड हल्ल्यातील पिडीतांच्या परवानगी शिवाय त्यांची छायाचित्रे संकेतस्थळावर अपलोड केल्याचा आरोपही या तक्रारीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर दोषी महिलेला अटक करुन तिचेवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी मेक लव नोट स्कार या एनजीओच्या संस्थापिका श्रीमती रिचा शर्मा हिचे विरोधात बांद्रा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६६२/२०१३ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सद्यःस्थितीत गुन्हा तपासाधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

धोकादायक इमारतीत अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

(६४) * ४०१३६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील इमारत क्र.११०, मन्सुरी इमारत, हुजारिया स्ट्रीट, नागपाडा ही इमारत मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत मोडकळीस आल्याने धोकादायक घोषित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत इमारत धोकादायक ठरवूनही या इमारतीत चौथ्या माळयाचे अनधिकृतपणे बांधकाम करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार याप्रकरणातील दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव येथील 'सुस्क इंडिया' कंपनीने सामान्य गुंतवणूकदारांची फसवणुक केल्याबाबत

(६५) * ४०२१० श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव येथील 'सुस्क इंडिया' कंपनीने सामान्य गुंतवणूकदारांची विविध आर्थिक लाभांच्या योजनांचे आमिष दाखवून ५० लाख रुपयांची फसवणुक केल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य संशयित यांच्याविरुद्ध तक्रार देऊनही पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य संशयितावर गुन्हा दाखल न करणाऱ्या दोषी अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) सदर कंपनी विरोधात जळगांव जिल्हा घटकात असा प्रकार घडलेला नसून, राज्यात कोठेही सदरबाबत कोणताही गुन्हा दाखल नाही.

(४) विलंब झालेला नाही.

राज्यातील व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या मागण्या प्रलंबित असल्याबाबत

(६६) * ३९०६९ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील (एचएससी,व्होकेशनल) शिक्षक व विद्यार्थ्यांच्या न्याय मागण्या मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने संघटनेच्यावतीने नागपूर येथे सन २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात धरणे आंदोलन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संघटनेच्या प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन व्यवसाय शिक्षण कर्मचारी महासंघ आणि व्होकेशनल इन्स्टक्टर्स टिचर्स असोसिएशन (विटा संघटना) यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक १८/१२/२०१७ रोजी नागपूर

येथे मा.मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे अध्यक्षतेखाली बैठक झाली. सदर बैठकीमध्ये सदर संघटनेच्या मागण्या तपासून कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत.

अंधेरी (पूर्व) परिसरातील तरुणाचा पोलिसांच्या लाठी हल्ल्यात मृत्यू झाल्याबाबत

(६७) * ३८८४२ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) परिसरातील चिकुवाडी येथील महापालिकेच्या के-पूर्व विभाग कार्यालयाने केलेल्या कार्यवाही मध्ये परिसरातील ५० ते ६० झोपडया तोडण्यात आल्या झोपडपट्टीवर महापालिकेने केलेल्या कारवाई दरम्यान गोंधळ उडाल्यामुळे पोलिसांनी केलेल्या लाठी हल्ल्यात तेथील रहिवाशी विजय पवार (वय २५) या तरुणाचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

दिनांक २९/१२/२०१७ रोजी चिकुवाडी, अंधेरी पुर्व येथे महानगर पालिकेकडून निष्कासन कारवाई वा पोलिसांनी केलेल्या लाठी हल्ल्यात तरुणाचा मृत्यू झाला, ही बाब खरी नाही.

सदर इसमाचा मृत्यू हा दिनांक २७/१२/२०१७ रोजी वडाळा टि.टि. याठिकाणी आकडी आल्याने त्यास उपचाराकरीता नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासून मयत घोषित केले होते. त्याचा मृत्यू क्षयरोग या नैसर्गिक (PULMONARY TUBERCULOSIS WITH FATTY LIVER NATURAL) आजाराने झालेला आहे, असे शवविच्छेदन अहवालामध्ये नमूद आहे. सदर प्रकरणाचा वडाळा पोलीस ठाणे येथे अपमृत्यू नोंद क्र. १५४/१७ कलम १७४ सी.आर.पी.सी. अन्वये चौकशी सुरु आहे.

मयत इसम हा पूर्वी गोल्ड स्पॉट जंक्शन, पश्चिम, द्रुतगती महामार्ग, अंधेरी पूर्व या ठिकाणी फुटपाथवर रहावयास होता. सदर ठिकाणावरील झोपड्यांचे महानगरपालिकेने दिनांक ०९/११/२०१७ रोजी निष्कासन कारवाई केली होती. त्यानुषंगाने, महानगरपालिकेचा निषेध म्हणून मयत इसमाचे नातेवाईक, वाघरी समाजाचे प्रतिनिधी, आर.पी.आय. संघटनेचे कार्यकर्ते यांनी मयत इसम यांचे शव दिनांक २८/१२/२०१७ रोजी सायन हॉस्पिटल येथून बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (पूर्व), मुंबई कार्यालयासमोर आणले होते. सदर वेळी पोलीस बदोबस्त लावण्यात आलेला होता. परंतु पोलीस लाठी हल्ल्याची कोणतीही घटना अंधेरी (पूर्व) येथे घडलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिका प्रशासनाने टीडीआर (विकास हस्तांतरण हक्क) गैरव्यवहार केल्याबाबत

(६८) * ३९६१३ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने टीपी स्किम एक मधील अंतिम भूखंड क्र. २०८-४ वर विकास प्रस्ताव क्र. एस-३/टी/०१९/१६ हा न्यु वंदना सहकारी गृहनिर्माण संस्थेचा विकास प्रस्ताव मंजूर करताना महानगरपालिका प्रशासनाने शहर विकास विभागासाठी शासन आदेश/परिपत्रके महापालिकेची विकास नियंत्रण नियमावली आणि शासनाची नगर भूमापन नियमावली यांचा भंग करून विकासकांच्या फायद्यासाठी चुकीच्या पद्धतीने विकास प्रस्ताव मंजूर करून २०० कोटी रुपयांचा टीडीआर (विकास हस्तांतरण हक्क) गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार श्री.संजय घाडीगावकर यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबरोबरच मोका लावण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) अनुक्रमांक (१) मधील तक्रार अर्जाचे अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेचा अहवाल दिनांक ३१/०१/२०१८ च्या पत्रान्वये मागविण्यात आला आहे. सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिडकोच्या मालकीच्या लीज होल्ड मालमत्ता फ्री होल्ड करण्याच्या प्रस्तावाबाबत

(६९) * ३७९२२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सिडको महामंडळाने लीज होल्ड मालमत्ता फ्री होल्ड करण्यात यावे असा प्रस्ताव सिडको संचालक मंडळाने राज्य शासनाकडे पाठविला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय. नवी मुंबई येथील सिडकोच्या मालकीच्या लिज होल्ड जमिनी फ्री होल्ड करण्यासंदर्भात सिडको संचालक मंडळाने दिनांक ११/८/२०१७ रोजी मंजूर केलेला ठराव क्र.११९१२ दिनांक २८/९/२०१७ रोजी शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या

पडताळणीअंती अधिकचे स्पष्टीकरण सिडकोकडून मागविण्यात आले असून त्यानंतर उक्त प्रस्तावाबाबत शासनस्तरावर निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील झोपडपट्टयामध्ये नागरी सुविधांची कामे करताना म्हाडा अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

(७०) * ३७९७१ ॲड.अनिल परब, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडपट्टयांमध्ये नागरी सुविधांची कामे करताना म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी कच्चा माल व कामाच्या दर्जाची बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याप्रकरणी दक्षता विभागाने म्हाडातील ५६ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांच्या चौकशीचे आदेश दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांच्या गैरव्यवहाराचे स्वरुप काय आहे व गैरव्यवहारात अंदाजीत किती रकमेचा अपहार झाला आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) होय, खरे आहे.
(२) व (३) भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षण अहवालात नमूद मुद्दे/आक्षेप तसेच त्या अनुषंगाने लोकलेखा समितीने विधानमंडळास ऑगस्ट, २०१७ मध्ये सादर केलेल्या २४ व्या अहवालातील शिफारसी विचारात घेऊन, शासनाच्या दिनांक १६/१२/२०१७ च्या

पत्रान्वये या प्रकरणी सविस्तर तपासणी म्हाडाच्या दक्षता विभागाकडून करण्यात यावी तसेच चौकशी केल्यानंतर दोषी आढळलेल्या म्हाडाच्या अभियंता/अधिकाऱ्यांवर नियमाप्रमाणे उचित कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

त्यानुसार मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा यांच्यामार्फत मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातील सुमारे ५६ अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे काम सुरु आहे व सदर चौकशीअंती अहवाल प्राप्त झाल्यास तो शासनास सादर करण्यात येईल व चौकशीअंती अहवाल प्राप्त झाल्यानंतर अंदाजीत रक्कम समजू शकेल, असे मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांनी शासनास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा या रुग्णालयामधील रुग्ण सेवांचे सक्षमीकरण करण्यासाठीचा निधी खर्च न केल्याबाबत

(७१) * ४०५९२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा या रुग्णालयामधील रुग्ण सेवांचे सक्षमीकरण करण्यासाठी सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षासाठी केलेल्या आर्थिक तरतुदीमधुन रुपये ८ कोटी खर्च न झाल्याचे तर सन २०१७-१८ या वर्षासाठी राखून ठेवलेल्या रुपये ३० कोटी रक्कमेपैकी सुमारे ६५ ते ७० टक्के रक्कम खर्च झाली असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६, सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या तिन्ही वर्षी तरतूद केलेली रक्कम खर्च न केल्यामुळे तसेच त्यापूर्वीच्या तरतुदीमधून खरेदी केलेली यंत्रसामुग्री विनावापर पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) अंशत: खरे आहे.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा या रुग्णालयामधील रुग्ण सेवांचे सक्षमीकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे निधी खर्च करण्यात आला आहे :-

- सन २०१५ -१६ मध्ये रुपये ३.५० लक्ष
- सन २०१६-१७ मध्ये रुपये १२ लक्ष
- सन २०१७-१८ मध्ये रुपये १३७ लक्ष

(२) हे खरे नाही.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयामार्फत यापूर्वी खरेदी करण्यात आलेली यंत्रसामुग्री वापरात आहे.

सन २०१५-१६ मध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात आली परंतु काही तांत्रिक बाबीमुळे सुधारीत निविदा काढण्यात आली. तसेच जुलै, २०१७ मध्ये वस्तु व सेवाकर कायदा (जी.एस.टी.) लागु झाल्यामुळे वस्तु व सेवाकराचा अंतर्भाव करुन तसेच इतर बाबी विचारात घेऊन रुपये १८,२०,४९,७९५ इतक्या रक्कमेची निविदा प्रक्रिया पुन्हा राबविण्यात आली व उक्त निविदा निश्चित करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पंढरपूर (जि.सोलापूर) येथील कचरा प्रक्रिया प्रकल्प सुरु करण्याबाबत

(७२) * ३८४०३ श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि. सोलापूर) येथे ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन गॅस तयार करणारा प्रकल्प मागील चार वर्षापासून बंद असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कासेगाव ग्रामपंचायत हद्दीत पंढरपूर नगरपालिकेचा कचरा डेपो असून शहरातील ओला व सुका कचरा तेथे साठविला जात असून या कचऱ्याचे विघटन व प्रक्रिया करण्यासाठी नगरपालिकेने गॅस निर्मिती करणारा प्रकल्प उभारला परंतू हा प्रकल्प बंद असल्याने उघडयावर टाकलेल्या कचऱ्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याने याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे अंशत: खरे आहे

पंढरपूर येथील सर्व्हे नं. १०० कंपोष्ट डेपो येथे ६ टन प्रतिदिन क्षमतेच्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन गॅस तयार करणारा प्रकल्प २००८ मध्ये सुरु करण्यात आला होता.

सदर बायोगॅस प्रकल्प सन २०१४ च्या अखेरीस नादुरुस्त झाल्याने बंद होता. सदर बायोगॅस प्रकल्पाचे दुरुस्तीचे काम माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये पूर्ण झाले असून सदर बायोगॅस प्रकल्प पुन्हा सुरु करण्यात आला आहे.

कासेगाव ग्रामपंचायत हद्दीतील कचरा डेपोमध्ये कचऱ्याचे विंड्रो कंपोष्टींग करुन अस्तिवात असलेल्या कचऱ्यापासून खत निर्मिती सुरु केली आहे.

सद्यःस्थितीत पंढरपूर शहरात दैनंदिन निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन बायोगॅस निर्माण करण्यात येत असून प्लास्टिक, धातू, कागद इत्यादी स्वरुपातील सुका कचरा हा कचरावेचकामार्फत पुनर्वापराकरिता पाठविण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मोशी (जि.पुणे) येथील जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया प्रकल्पास मान्यता मिळण्याबाबत

(७३) * ३८७८५ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोशी (जि.पुणे) येथे होत असलेला जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प पर्यावरण विभागाच्या परवानगी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकल्पाला मान्यता मिळावी यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा घनकचरा प्रकल्प मौजे मोशी जि.पुणे येथे स्थलांतरीत करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत चालू आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर प्रकल्पास केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची ना-हरकत घेणे आवश्यक आहे.

त्यास अनुसरुन पर्यावरण संदर्भातील विविध चाचण्या करण्यात आलेल्या आहेत.

तद्नंतर स्टेट एक्सपर्ट ॲप्रेझल कमिटी (एसईएसी) State Expert Appraisal Committee (SEAC) ची मिटींग संपन्न झालेली आहे. त्यास अनुसरुन या प्रकल्पाकरीता जाहिर सुनावणी घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

त्यामुळे प्रस्तुत जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या प्रकल्पाचे काम प्रलंबित आहे ही वस्तुस्थिती आहे.

सदरची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर प्रकल्प सुरु करण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पोलिसांच्या खाजगी मालकीच्या घरांसाठी पंतप्रधान आवास योजनेचा लाभ देण्याबाबत

(७४) * ३८५७४ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन २०२२ पर्यंत "सर्वांसाठी घरे" या योजनेंतर्गत पोलिसांच्या खाजगी मालकीच्या घरांसाठी पंतप्रधान आवास योजनेचा लाभ देण्याचे ठरविले असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी नवी मुंबईतील पनवेल येथे जागा निश्चित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत प्रत्येक घरांसाठी सुमारे २ लाख ७५ हजार रुपयांचे अनुदान पोलिसांना देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

याबाबत असे नमूद करण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) च्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन सदर योजना राज्यात राबविण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

ज्या व्यक्तीचे देशातील कोणत्याही भागात पक्के घर नाही व सदर व्यक्ती आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) अथवा अल्प उत्पन्न गटात (LIG) मोडते अशा पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत घटक क्र.१ साठी केंद्र शासनाचे अनुदान प्रत्येकी रुपये १ लक्ष व घटक क्र. ३ व ४ साठी प्रत्येकी रुपये १.५ लक्ष अनुज्ञेय आहे. तसेच घटक क्र. १, ३ व ४ साठी राज्याचे अनुदान प्रत्येकी रुपये १ लक्ष अनुज्ञेय आहे. यानुसार घटक क्र. ३ व ४ साठी प्रत्येकी रुपये २.५ लक्ष अनुदान अनुज्ञेय आहे.

सद्य:स्थितीत प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) विविध ४ घटकांतर्गत राज्यातील एकूण ३८२ शहरे व त्यालगतच्या नियोजन क्षेत्रामध्ये राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुरबाड (जि.ठाणे) बाजारपेठेतील तीन मजली इमारतीला आग लागून नुकसान झाल्याबाबत

(७५) * ३८९९७ श्री.रविंद्र फाटक, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) बाजारपेठेतील तेलवणे कुटुंबियांच्या मालकीच्या १५० वर्षे जुन्या तीन मजली इमारतीला माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त इमारतीमध्ये मोठया प्रमाणात सागवानी लाकूड वापरण्यात आल्याने आगीने पेट घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आग लागण्यामागची कारणे काय आहेत, आगीत नुकसान झालेल्यांना शासनाने आर्थिक मदत दिली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

दिनांक ०५/०१/२०१८ रोजी रात्रौ १०.३० चे सुमारास घडली आहे.

(२) व (३) सदर घर हे १५० वर्षापुर्वीचे जुन्या बांधणीचे असून त्यामध्ये साग व शिसव लाकडाचा वापर करण्यात आला होता. प्रथमदर्शनी खबर देणार व साक्षीदार यांच्या चौकशीवरुन सदर घरास व त्यापुढील गाळयामधील दुकानास इलेक्ट्रिक शॉर्टसर्किटने आग लागल्याचे दिसून येत आहे. या आगीत कोणत्याही प्रकारची जिवित हानी झालेली नाही. या आगीत इमारतीतील ६ कुटुंबांचे पुर्णत: नुकसान झाले असून शेजारील इमारतीतील ३ घरांचे अंशत: नुकसान झाले आहे.

आगीत पुर्णत: नुकसान झालेल्या सहा आपद्ग्रस्तांना प्रत्येकी रुपये ९५,१००/- व अंशत: नुकसान झालेल्या तीन आपद्ग्रस्तांना प्रत्येकी रुपये ५,२००/- इतकी रक्कम आर्थिक मदत म्हणून नैसर्गिक आपत्ती निधीतून मंजूर करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमळनेर (जि.जळगाव) येथील रेल्वे भुयारी मार्गासाठी निधी उपलब्ध करणेबाबत

(७६) * **४०२१९ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगाव) येथील तंबोली सिनेमा ते विप्रो कंपनी दरम्यान रस्त्यावरील रेल्वे भुयारी मार्गाचा प्रस्ताव निधी अभावी नगरविकास विभागाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रेल्वे भुयारी मार्गाच्या उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करणेबाबत शासनामार्फत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही. अमळनेर नगरपरिषदेमार्फत असा कुठलाही प्रस्ताव नगर विकास विभागास पाठविला नसल्याबाबत मुख्याधिकारी, अमळनेर नगरपरिषद यांनी अहवाल सादर केला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.